बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे





बेरार टाईम्स द्वारा प्रकाशित पर्यटन पुस्तिका उपलब्ध अंक व जाहिरातकरिता संपर्क स्थळ



वर्ष -९ | गोंदिया | अंक ४६ | आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | बुधवार,दि.२१ ते २७ ऑक्टोंबर २०२० | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021


# सरकारच्या राजपत्राला अधिकाऱ्यांचा ठेंगा,दिव्याचा मोह सुटेना



**खेमेंद्र कटरे**

**गोंदिया:–** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्रीय मंत्रीमंडळाने १ मे २०१७ पासून केंद्रीय मंत्र्यापासून राज्यातील मंत्री,अधिकाऱ्यांच्या शासकीय वाहनावर असणारे (लाल,अंबर,निळा) दिवे हद्दपार केले. त्याची अमलंबजावणीही सुरु झाली. त्या निर्णयाला सर्वच राज्यानी अमलांत आणले असले तरी महाराष्ट्रातील काही अधिकारी त्या नियमांला तिलांजली देत आपल्या वाहनावर आजही दिवे लावून फिरत असल्याचे चित्र बघावयास मिळत आहे.

कुठल्याही जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारीच नव्हे तर सचिवस्तरावरील अधिकारी असो की कुणीही यांना आपल्या वाहनावर दिवा लावता येणार नसल्यासंदर्भातला भारत सरकारचा राजपत्रच निघालेला आहे.

परंतु या राजपत्राला ठेंगा दाखवत गोंदियाच्या विद्यमान जिल्हाधिकारी यांनी (तत्कालीन नव्हे) व जिल्हा परिषदेच्या सीईओंनी तर चक्क अंबर दिवा आपल्या वाहनावर लावून त्या राजपत्राचीच अवहेलना केल्याचे दिसून येत आहे. दरम्यान यासंदर्भात परिवहन विभागाकडे चौकशी केली असता दिवा लावण्यांसदर्भात भारतसरकारने नियम ठरवून दिले आहेत.कुणाला दिवा लावायचाच असेल तर आधी आमच्या विभागाकडे स्टिकरची मागणी करावी लागते असे सांगितले.

शासनाने फक्त निवडक विभागानाच दिवा वापरण्याची परवानगी दिली आहे. त्यातच आपत्ती व्यवस्थापनाच्या वेळी संबधित ठिकाणी जायचे असेल तेवढ्या वेळापुरताच ठरवलेला दिवा लावायचा असतो,परंतु गोंदियात त्या नियमांनाही तिलांजली देण्यात आली असून त्यासाठी उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून स्टिकर घेण्यात येतो तो सुध्दा अद्याप घेण्यात आलेला नसून आपत्ती व्यवस्थापनाचा दिवा लावण्यासंदर्भातही जिल्हाधिकारी कार्यालयाने कुठलाच प्रत्रव्यवहार केला नसल्याचे उघडकीस आले आहे.

मंत्री आणि अधिकाऱ्यांच्या गाड्यांवरील लाल दिव्यांबाबत केंद्रीय मंत्रिमंडळाने निर्णय २०१७

**भंडारा-गोंदिया जिल्ह्याच्या नेहमी सहवासात असणारे विधानसभा अध्यक्ष नाना पटोले आणि राज्याचे गृहमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री असलेले अनिल देशमुख यांच्या वाहनावरही कुठल्याच रंगाचा दिवा बघायला मिळत नाही. त्यातच नागपूर विभागीय आयुक्त जे जिल्हाधिकारी यांचे प्रमुख आहेत. त्यांच्याही वाहनावर दिवा असल्याचे बघायला मिळत नाही.**

च्या एप्रिलमध्ये घेतला आणि त्याची अमलबंजावणी १ मे २०१७ पासून सुरु केली. केवळ काही महत्त्वाच्या श्रेणीतील मंत्री आणि अधिका-यांना या निर्णयातून वगळण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या दिव्यांच्या वापराबाबत डिसेंबर २०१३ मध्ये सवीच्च न्यायालयाने केवळ घटनात्मक पदावरील व्यक्तींसाठीच वाहनांवर दिव्यांचा वापर असावा, असे म्हटले होते. केंद्र सरकारने त्यापुढे जाऊन राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, सरन्यायाधीश वगळता अन्य घटनात्मक पदांवरील व्यक्तींच्या वाहनांवरील दिवेही काढण्याचा निर्णय घेतला.

मंत्री वा राज्यमंत्री करा, किमान तो दर्जा द्या; लाल दिव्याची गाडी द्या, अशी अनेक राजकारण्यांची विनंती वा इच्छा असते, पण १ मे २०१७ पासून पंतप्रधान, केंद्रीय मंत्री, राज्याचे मुख्यमंत्री व मंत्री, विधानसभाध्यक्ष, विधान परिषदेचे सभापती, सवीच्च व उच्च न्यायालयाचे न्यायाधीश, वरिष्ठ नोकरशहा यांच्यापैकी कोणाच्या वाहनांवर लाल काय कुठलाच दिवा



सतत दिसणार नाही.

तसा निर्णय केंद्रसरकारने घेतला होता.मात्र त्या निर्णयाला गोंदियासह बहुतांश जिल्ह्यातील अधिकाऱ्यांनी ठेंगा दाखविल्याचे दिसून येत आहे.

## राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक गप्पु गुप्ता यांचा काँग्रेस प्रवेश



**गोंदिया:** राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक राहिलेले आणि विधानसभा निवडणुक लढविलेले अशोक (गप्पू) गुप्ता यांनी २० ऑक्टोबंरला मुंबई येथे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात, विधानसभा अध्यक्ष नानाभाऊ पडोले,महिला बालविकास मंत्री यशोमती ठाकूर,काँग्रेस महासचिव



मोहन जोशी, आमदार सहेसराम कोरटी,राज्यमंत्री सतेज पाटिल, गोंदिया जिल्हा काँग्रेस अध्यक्ष नामदेवराव किरसान, योगेश अग्रवाल, राजु काळे यांच्या उपस्थितीत पप्पू पटले,प्रकाश देवाधारी, विजय उके,नरेंद्र चिखलोंडे, गोपाल



अजनीकर, आसीफ सय्यद,योगेश भेलावे,महेश पाचे, सचिन मेश्राम, महेश लांजेवार,चुनेश पटले काँग्रेस पक्षात समर्थकांसह प्रवेश केला.

गुप्ता यांच्या काँग्रेस प्रवेशाने गोंदिया शहरातून एक चांगला युवा नेता राष्ट्रवादी काँग्रेसमधून निघाल्याने राष्ट्रवादीला खिंडार पडले आहे.

विधानसभा अध्यक्ष नाना पटोलेंच्या मार्गदर्शनात गुप्ता यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश घेतला. राष्ट्रवादीचा युवा नेता काँग्रेस प्रवेश करणार अशी बातमी बेरार टाईम्सने आपल्या १४ ऑक्टोंबरच्या अंकात प्रकाशित केली होती.त्यावर शिक्कामोर्तब झाले आहे.

गुप्ता यांनी भविष्यातील विधानसभा निवडणुक लक्षात घेता आत्तापासूनच आपण कुठेतरी सक्षमपणे काम केले पाहिजे या भूमिकेला स्विकारत राष्ट्रवादी काँग्रेस सोडून काँग्रेसमध्ये प्रवेश घेतलेला निर्णय राजकीय दृष्टीने योग्य असल्याचे मत व्यक्त केले जाऊ लागले आहे. गुप्ता यांच्या प्रवेशाने काँग्रेसला गोंदिया विधानसभा मतदारसंघातच नव्हे तर आमगावसह इतर मतदारसंघातही बळकटी मिळवून देण्यात महत्वाचा ठरणार आहे.

## 'त्या' मृत नक्षल्यांवर होते १८ लाखांचे बक्षीस

**गडचिरोली:** उपविभाग धानोरा अंतर्गत येणा?या पोलिस मदत केंद्र ग्यारापत्ती हद्दीतील किसनेली जंगल परिसरात काल १७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४ वाजता सी-६० जवान व नक्षल्यांमध्ये झालेल्या चकमकीत ५ नक्षलवादी ठार झाले होते. यात एक पुरुषाचा व ४ महिलांचा समावेश आहे. समीता उर्फ राजो किरको (३४) रा. मंगनेर ता. धानोरा, कुमली चिपळुराम गावडे (२३) रा. कटेझरी ता. धानोरा, सुमन उर्फ झुनकी उर्फ सुलकी बुद्धा पदा (३२) रा. पिपली बुर्गी, ता. एटापल्ली. चंदा उर्फ चंदना उफ ' मासे भालसे/भाकसे (२५) रा. बुडगीन ता. जेगरगुन्डा जि. बजापूर, टिरा उर्फ निलेश उर्फ शिवाजी दारसू मडावी (३०) रा. चिचोडा ता. धानोरा असे चकमकीत ठार झालेल्या नक्षल्यांची नावे आहेत. या मृत ५ नक्षलवाद्यांवर शासनाने १८ लाखांचे बक्षीस जाहीर केली होते, अशी माहिती पोलिस दलाने आज आयोजित पत्रकार परिषदेतून दिली.



समीता उर्फ किरको ही प्लाटून क्र. १५ ची सदस्या होती. ती सन २०११-१२ मध्ये प्लाटून क्र. २० मध्ये भरती होऊन सन २०१२-१३ मध्ये तिने पोटेगाव दलम सदस्य म्हणून काम केले. २०१३-१४ ते आजपर्यत ती प्लाटून क्र. १५ चे सदस्य पदावर कार्यरत होते. तिचेवर गडचिरोली जिल्ह्यातील विविध पोलिस स्टेशनमध्ये २ खून, ९ चकमक व ३ असे एकूण १४ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. तिचेवर शासनाने ४ लाखांचे बक्षीस जाहीर केले होते. कुमली चिपळूरा गावडे ही कोरची दलम सदस्य होती. २०१६ मध्ये भरती होऊन २०१६- ते २०१८ पर्यंत टिपागड एलओएस मध्ये कार्यरत होती.

२०१८-२०२० पर्यंत कसनसूर एलओएस मधील डीव्हीसीएम सुजनक्काची बॉडीगार्ड पदावर कार्यरत होती. ती सध्या कोरची दलम सदस्य पदावर कार्यरत होती. तिचेवर जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यामध्ये २ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून कुमली हिच्यावर शासनाने २ लाखांचे बक्षीस जाहीर केले होते. सुमन उर्फ झुनकी बुच्दा पदा ही टिपागड दलम एसीएम सदस्य म्हणून सन २००६-०७ मध्ये भरती होऊन २००९ पर्यत ती मिलीशिया सदस्य म्हणून कार्यरत होती. २००९ ते २०११ पर्यंत ती इतर राज्यात व जिल्ह्यात सदस्य म्हणून काम केले त्यानंतर २०१२-१३ मध्ये ती कसनसूर एलओस मध्ये कार्यरत होती. २०१३ ते २०१८ पर्यंत प्लॉटन क्र. ३ व ४ मध्ये पीपीसीएम म्हणून कार्यरत होती. २०१८-१९ मध्ये प्लॉटून १५ मध्ये ती पीपीसीएम म्हणून कार्यरत होते. २०१९ ते आजपर्यंत टिपागड एलओएसमध्ये एसीएम सदस्या पदावर कार्यरत होती. तिच्यावर १ खून, १४ चकमक व इतर ६ असे २१ गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. शासनाने तिच्यावर ६ लाखांचे बक्षीस जाहीर केले होते.

चंदा उर्फ चंदना भालसे/भाकसे ही प्लॉटन क्र. १५ ची सदस्य असून ती सन २०१८ मध्ये भरती होवून आजपर्यंत प्लॉटून क्र.१५ ची सदस्य म्हणून कार्यरत होती. शासनाने तिच्यावर ४ लाखांचे बक्षीस जाहीर केले होते. टिरा उर्फ निलेश मडावी हा टिपागड बदल सदस्य असून तो २०१५ मध्ये भरती होऊन २०१९ पर्यंत चातगाव एलओएस मध्ये सदस्य म्हणून कार्यरत होता. २०१९ ते आजपर्यंत तो टिपागड दलम सदस्य पदावर कार्यरत होता. त्याच्यावर ६ खून, ७ चकमक व ७ असे एकूण २० गंभीर गुन्हे विविध पोलिस ठाण्यात दाखल आहेत. शासनाने त्याच्यावर २ लाखांचे बक्षीस जाहीर केले होते.

या वर्षात आतापर्यंत १० नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात गडचिरोली पोलिस दलास यश आले असून २०२० या वर्षातील हीपोलिस दलाची सर्वात मोठी कामगिरी आहे. सी-६० कमांडोच्या या शौर्यपूर्ण कामिगिरीचे पोलिस उपमहानिरीक्षक संदीप पाटील, पोलिस अधीक्षक अंकीत गोयल यांनी केले आहे. नक्षलविरोधी अभियान आणखी तीव्र करण्याचे संकेत दिले आहेत.



### बावनथडी प्रकल्पाच्या पाण्यासाठी राज्यमार्गावर २२ ला रास्ता रोको आंदोलन

**मोहाडी(सालई खुर्द)-** : यावर्षी आंतरराज्यीय बावनथडी प्रकल्प तुडूंब भरले असून सद्यस्थिती या प्रकल्पात विक्रमी ९६ टक्के जलसाठा आहे. यंदा मात्र शेतकऱ्यावर दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली असून भरपाई काढण्यासाठी शेतकऱ्यांना उन्हाळी धानपिकासाठी बावंनथडी प्रकल्पाचे पाणी नेरला (सालई खुर्द) कालवा क्रमांक २ ला देण्यात यावे अन्यथा तुमसर-रामटेक राज्यमार्गावर २२ ऑक्टोबरला सालई खुर्द बस स्टॉप चौकात तिव्र रास्ता रोको आंदोलन करण्याचे निवेदन १९ ऑक्टोबर रोजी सहाय्यक अभियंता (श्रेणी एक) बावंनथडी पाटबंधारे उपविभाग बघेडा(तुमसर), महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष नाना पटोले, आमदार राजू कारेमोरे, माजी आमदार चरण वाघमारे, उपविभागीय अधिकारी नितीन सदगीर, नायब तहसिलदार सोनकुशरे, पोलिस निरीक्षक दीपक वानखेडे पोलीस स्टेशन आंधळगाव यांना निवेदन देण्यात आले आहे.आंदोलन करण्याचे निवेदन प्रकाश खराबे, अशोक पटले, किशोर भैरम, नितीन लिल्हारे, हैशोक शरणागत, डॉ सुनील चवळे, भोलाराम पारधी, ईश्वरद्याल गिरीपुंजे, शोभाराम गिरीपुंजे, गणेश दमाहे, बबन टाले, प्रदीप सरोते, गोपाल लिल्हारे, शिवदास लिल्हारे, आदींनी दिले आहे.

## गोंदिया जिल्ह्यात कोरोनामुक्त रूग्णांची संख्या ७७०१

**गोंदिया-**जिल्ह्यात आणखी ७४ जणांना कोरोनाची बाधा झाल्याचा अहवाल शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या विषाणू संशोधन व निदान प्रयोगशाळेतून २० ऑक्टोबर रोजी प्राप्त झाला.अर्जुनी/मोरगाव येथील २४ वषीय बाधित रुग्णाचा १५ ऑक्टोबर रोजी उपचारादरम्यान अर्जुनी/मोरगाव येथील ग्रामीण रुग्णालयात मृत्यू झाला. ४० रुग्ण औषधोपचारातून बरे झाल्याने आज सुट्टी देण्यात आली.

आज नव्याने ७४ कोरोना बाधित रुग्ण आढळले. तालुकानिहाय रुग्ण संख्या पुढीलप्रमाणे. गोंदिया तालुका -४६, आमगाव तालुका-०५, देवरी तालुका-११ सडक/अर्जुनी तालुका -०४, अर्जुनी/मोरगाव-०७ आणि बाहेर जिल्हा व बाहेर राज्यातील एक रुग्ण आज आढळून आला आहे.

आतापर्यत ८८१९ रुग्ण कोरोना बाधित आढळले आहे. आतापर्यंत कोरोनातून ७७०१ रुग्ण मुक्त

जिल्ह्यातील बाधित रुग्ण आजारातून बरे होण्याचे प्रमाण ८७.०६ टक्के आहे.बाधीत रुग्णांचा मृत्यु दर हा १.२३ टक्के आहे.

जिल्ह्यात ११२ कोरोनाबाधित रुग्णांचा आतापर्यंत मृत्यू झाला. यामध्ये गोंदिया तालुका-६६, तिरोडा तालुका-१६, गोरेगाव तालुका-४, आमगाव तालुका-६, सालेकसा तालुका-२ देवरी तालुका-२, सडक/अर्जुनी तालुका-३, अर्जुनी/मोरगाव तालुका -३ व बाहेर जिल्हा व राज्यातील दहा रुग्णांचा समावेश आहे.

## धानाला मिळणार ७०० रुपयाचे बोनस-खा.प्रफुल पटेल

**गोंदिया :**पूर्व विदर्भातील धान उत्पादक शेतकऱ्यांसाठी मागील वषीप्रमाणेच यावषी सुद्धा सातशे रुपयांचा बोनस जाहीर होणार असून धानाला एकूण अडीच हजार रुपयांचा भाव मिळणार आहे. याबाबत लवकरच कॅबिनेट बैठकीत मंजुरी मिळणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खा. प्रफुल पटेल यांनीयेथे पत्रकार परिषदेत दिली.यावेळी माजी खासदार डॉ.खुशाल बोपचे,माजी आमदार राजेंद्र जैन उपस्थित होते.

ते म्हणाले, राज्य शासनाने मागील वर्षीच्या खरीप हंगामासाठी धानाला सातशे रुपयांचा बोनस जाहीर केला होता. त्यापैकी जवळपास ९८ टक्के शेतकऱ्यांना बोनसची रक्कम मिळाली आहे. त्यातून सुमारे १४०० कोटी रुपयांची बोनसची मोठी रक्कम शेतकऱ्यांना प्राप्त झाली आहे. त्यातही भंडारा आणि गोंदिया या दोन जिल्ह्यात धान उत्पादक शेतकऱ्यांची संख्या अधिक असल्याने बोनस राशीचा मोठा हिस्सा या दोन जिल्ह्यातील शेतकऱ्यांनाच मिळाला असल्याने येथील शेतकऱ्यांसाठी ही मोठी बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावर्षी केंद्र सरकारने धानाला १८६८ रुपये हमीभाव जाहिर केला आहे. ऑगस्ट महिन्यात आलेल्या महापूराने पूर्व विदर्भातील धान शेतीचे मोठे नुकसान केले. नदीकाठावरील शेतशिवारातील



धानपिकाला पुराचा फटका बसला असला तरी उर्वरित भागात धानाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात झाले आहे. त्यामुळे पूर्व विदर्भातील धान उत्पादक शेतकऱ्यांना मागील वर्षीप्रमाणेच याहीवर्षी सातशे रुपयांचा बोनस जाहीर करण्यात येईल. याबाबत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांशी आपली चर्चा झाली आहे. लवकरच कॅबिनेटमध्ये याला मंजुरी मिळेल. त्यामुळे धानाला २५६८ रुपये इतका भाव मिळणार आहे. दरम्यान, बोनसची रक्कम मिळण्यासाठी शेतकऱ्यांना काही दिवस प्रतीक्षा करावी लागेल, असेही खा. पटेल यांनी सांगितले.

धान खरेदी संदर्भात सांगितले की मागच्या वर्षी त्याच्या पूर्वीच्या वर्षीच्या तुलनेत तीनपट अधिक धानखरेदी झाली होती. यावर्षी सुद्धा धान खरेदी वाढणार आहे. त्यामुळेच सध्या येणाऱ्या अडचणी दुर करण्याचे प्रयत्न सुरू आहे. नवीन केन्द्र वाढविण्याचे प्रयत्न केले जाणार, गोडाऊन, मिलिंग यांच्या तृट्या दुर करण्याचे प्रयत्न सुरू आहे. यावर्षी कृषी उत्पन्न बाजार समितीला सुद्धा धान खरेदीची मंजुरी दिल्या जावू शकते का हे पहावे लागणार आहे. पटेल यांनी विविध विषयावर पत्रकारांशी चर्चा केली. त्यांनी सांगितले की मागच्या वषी केन्द्र सरकारने फ्नत १८१८ रूपये शासकीय हमीभाव घोषित केले होते.

यावर्षी १८६८ रूपये हमीभाव आहे. याचा अर्थ एक क्विंटल धानावर फ्नत ५० रूपयाची वाढ झालेली आहे. आम्ही आपल्या घोषणा पत्रात सरकार आल्यावर २५०० रूपये भाव देण्याचे आश्वासन दिले होते. ७०० रूपये बोनस दिले होते. केन्द्र सरकारची भुमिका फ्नत ५० रूपये वाढविण्याची आहे. त्यामुळे आम्ही फ्नत बोनस देऊन काहीतरी शेतकऱ्यांच्या पदरी टाकण्याच्या प्रयत्नात आहोत. मागच्या वर्षी शेतकऱ्यांसाठी जे नवीन कायदा कुणालाही विश्वासात न घेता संसदेत मंजूर करवून घेतला, त्याबद्दल प्रफुल पटेल म्हणाले की घाईगदीत हे पाऊलउचलण्यात आले.

पूर्वी त्या कायद्याचा अभ्यास केला असता, शेतकरी नेत्यांशी चर्चा केली असती, प्रगतीशील शेतकऱ्यांचे विचार मागविले असते तर शासनाला एवढा विरोध झालाच नसता. या कायद्यात सर्वात मोठा गोंधळ हमीभाव राहणार की नाही याबाबत काही माहिती नाही.

## भंडारापर्यंत धावणार ब्रॉडगेज मेट्रो



**नागपूर :** नागपूरपासून जवळ असलेल्या नरखेड, भंडारा, वर्धा व रामटेक या शहरांना जोडणारा महामेट्रोच्या बहुप्रतिक्षित ब्रॉडगेज (बीजी) मेट्रो प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळाने गेल्या बुधवारी मंजुरी दिली. हा प्रस्ताव आता मंजुरीसाठी केंद्र सरकारकडे पाठवला जाणार आहे. एकदा त्याची मान्यता मिळाल्यवर भारतीय रेल्वेच्या रुळावरून मेट्रो धाऊ लागेल.

महामेट्रोच्या सर्वात महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी हा एक प्रकल्प असून याद्वारे नागपूर व चार उपग्रह शहरे यांच्यात वातानुकूलित, वेगवान, विश्वासार्ह आणि आरामदायक सेवा उपलब्ध होणार आहे. भारतीय रेल्वेच्या विद्यमान पायाभूत सुविधांचा उपयोग करून प्रवासी वाहतूक प्रदान करणारी ही देशातील एकमेव सेवा ठरणार आहे.

नागपूर ते नरखेड या ८५.५३ किलोमीटर मार्गाचा समावेश आहे. या मार्गावर ११ स्थानके राहणार आहेत. नागपूर शहरातून होणाऱ्या वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी महामेट्रो आणि मध्य रेल्वे यांच्यात २०१८ मध्ये एक सामंजस्य करार करण्यात आला होता.

हा प्रकल्प दोन टप्प्यात पूर्ण होणार आहे. यातील पहिला टप्पा २०२१ ते २०३१ या काळात दुसरा टप्पा २०३१ नंतर सुरू होणार आहे. यात नागपूर ते नरखेड हा ८५.५३ किमी, नागपूर-वर्धा ७८.८ किमी, नागपूर-रामटेक ४१.६ व नागपूर-भंडारा रोड हा ६२.७ किलोमीटर रेल्वेमार्गाचा समावेश राहणार आहे. नागपूरच्या जवळच्या गावातून नागपुरात ये-जा करणाऱ्यांची भविष्यात संख्या वाढणार आहे. त्यांची वाहतूक सुलभ होण्यासाठी आणि रस्त्यावरील ताण कमी करण्यासाठी या प्रकल्पामुळे मदत होणार आहे.

**जलद प्रवास**

| स्थळ | वेळ |
|---|---|
| नागपूर -वर्धा | १.१० मि |
| नागपूर-नरखेड | १.१५ मि. |
| नागपूर-रामटेक | १.१५ मि. |
| नागपूर-भंडारा | ०.५५ मि. |

### शहरात मेट्रो सुरूकरण्यासाठी मानक कार्य प्रणालीची प्रतीक्षा

राज्य सरकारने गुरुवारपासून मेट्रो सुरू करण्याची परवानगी दिली असली तरी नागपूरकरांना थोडी प्रतीक्षा करावी लागणार आहे. मेट्रो सुरू करण्यासाठी सरकारने मानक कार्यप्रणाली निर्धारित केली असून ती महामेट्रो कार्यालयाला बुधवापर्यंत प्राप्त झाली नव्हती. ती आल्यावर मेट्रो सुरू करण्याबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल, असे महामेट्रो कार्यालयाकडून सांगण्यात आले.

### नागपूर-नरखेड मार्गासाठी ३३३ कोटी

मेट्रोची व्याप्ती नरखेडपर्यंत वाढवण्यात आल्याने त्याचा व्यवसाय वृद्धी आणि सर्वसामान्य जनतेला लाभ होणार असल्याची प्रतिक्रिया या भागाचे आमदार व राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनी व्यक्त केली. या प्रकल्पासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे पाठपुरावा केला होता. याकडे त्यांनी लक्ष वेधले.

### गडकरींकडून राज्य शासनाचे आभार

ब्रॉडगेज मेट्रोला मान्यता दिल्याबद्दल केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले. या प्रकल्पामुळे छोट्या शहरांना प्रवासी वाहतुकीचा लाभ होईल व वेळेची बचत होईल, असा दावा त्यांनी केला.

साप्ताहिक **बेरार टाईम्स** | निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक | http://berartimes.com | बुधवार,दि.२१ ते २७ ऑक्टोंबर २०२० | 2

## संपादकीय

### एपरतीच्या पावसाचा तडाखा,संकटावर संकट

राज्यातील अनेक भागांमध्ये परतीच्या पावसाने अक्षरश: थैमान घातले आहे. विशेषत: ग्रामीण भागात पावसाचा प्रचंड जोर आहे. त्यामुळे शेकडो हेक्टर शेती पाण्याखाली गेली आहे. परिणामी हातातोंडाशी आलेले सोन्यासारखे पीक मातीमोल झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर धाय मोकलून रडण्याची वेळ आली आहे.सुरवातीला पुर्व विदर्भातील धान उत्पादक पट्यात कहर माजविल्यानंतर मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्राला या परतीच्या पावसाने अक्षरंश झोडपल्याने जनजिवन विस्कळित झाले असून संकटावर संकट अशी पाळी आली आहे.विर्दभातही यावेळी समाधानकारक पाऊस झाल्यानंतर मराठवाड्यातही यंदा नेहमीच्या सरासरीपेक्षा खूपच जास्त प्रमाणात पाऊस कोसळला आहे. त्यामुळे गेल्या काही महिन्यांत शेतकऱ्यांना व्यवस्थित पीक घेता आले नव्हते. यानंतरही शेतक्यांनी उमेद न हारता दुबार–तिबार पेरणी केली होती. पिकांनी तग धरल्यामुळे या मेहनतीचे चीजही होताना दिसत होते. मात्र, परतीच्या पावसाने शेतकऱ्यांची ही सर्व मेहनत पाण्यात घालवली आहे. आधीच उल्हास त्यात आला फाल्गुन मास अशी काहीशी अवस्था देशभरातील शेतकऱ्यांची आणि नागरिकांची झालेली आहे. कोरोना संसर्ग आणि लॉकडाऊनमुळे मार्चपासून बंद असलेले रोजगार, व्यवसाय, शाळा आत्ता कुठे हळूहळू पूर्वपदावर येत आहेत असे वाटत असतानाच महाराष्ट्रसह, आंध्रप्रदेश, तेलंगणा, मध्यप्रदेश आदी अनेक राज्यांत परतीच्या मुसळधार पावसाने सर्वसामान्यांचे आयुष्य विस्कळीत केले आहे.

महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमेलगत जाणाऱ्या चक्रीवादळाच्या जोरामुळे राज्यातील अनेक ठिकाणी कधी नव्हे इतका पाऊस कोसळला आहे. हवामान खात्याने कोकण, मुंबईसह अनेक ठिकाणी रेड अलर्ट जारी केला आहे. विजेचा गडगडाट आणि वेगाने वाहणारे वारे यांच्या सोबतीने धुँवाधार कोसळणाऱ्या पावसाने अनेक गावांचा संपर्क तुटला आहे. राज्यातील बहूतांश धरणे ओव्हर फ्लो झाली असून पादचारी पूल पाण्याखाली गेले आहेत. सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर, मराठावाडा, औरंगाबाद आदी भागात स्थानिक प्रशासनाने तलाठ्यांसह सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांना नोकरीच्या ठिकाणीच मुक्काम करण्याचे फर्मान काढले आहे, तर शेतकऱ्यांनी आपल्या शेतात बांधलेल्या शेततळ्यातील भरुन जाणाऱ्यां पाण्यामुळे होणारे नुकसान लक्षात घेत, या तळ्यातील पाणी कमी करण्याचे प्रयोग सुरु केले आहेत. जूनमध्ये लांबलेल्या पावासाने ऑगस्टपासून बरसण्यास सुरुवात केली. त्यातच निसर्ग चक्रीवादळाच्या तडाख्याने कोकणवासीयांना अतोनात नुकसानीला सामोरे जावे लागले. चक्रीवादाळामुळे उन्मळून पडलेली झाडे, विजेचे खांब, उद्धवस्ते झालेली घरे अद्यापही दुरुस्तीच्या प्रतिक्षेत असतानाच आता पुन्हा एकदा परतीच्या पावसाने उरले सुरले पीकही पाण्यात गेले आहे. सोयाबीन, मका, कपाशी, मक्याचे पीक, तांदूळ जमिनदोस्त झाले आहे, तर सांगली, तासगाव, नाशिक परीसरात बागायतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पाझर तलाव फुटल्याच्या आणि नदी नाले तुडूंब भरल्याने आसपासची शेती, घरे पाण्याखाली गेल्याच्या घटना घडल्या आहेत. या नैसर्गिक आपत्तीने शेतकरी हवालदिल झाला आहे. संपूर्ण शेतीच पाण्याखाली गेली. आता आम्ही जगायचे कसे, आमच्या मुलाबाळांचे शिक्षण कसे करायचे, असा उद्विग्न सवाल शेतक–यासमोर आ वासून उभा ठाकला आहे. गेल्या चार दिवसांपासून राज्यात पाऊस बरसत आहे. मात्र, परवापासून पावसाचा जोर आणखीनच वाढला आहे. परिणामी धरण क्षेत्रात पाण्याची आवक वाढल्यामुळे रात्रीपासून धरणातून नदीपात्रात मोठ्याप्रमाणावर पाण्याचा विसर्ग सुरु आहे. नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. राज्यातील बहूतांश नद्यांनी धोकादायक पातळी ओलांडली असून पुलावरून पाणी वाहत आहे. पंढरपुरात अतिवृष्टीने काहींना आपला जीव गमवावा लागला आहे, तर तैलंगणा, हैदराबाद येथे जवळपास ४० जणांना जलसमाधी मिळाली आहे. सांगली जिल्ह्यात तीन जण पाण्याच्या प्रवाहासोबत गाडीसह वाहून गेले आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातही मुसळधार पाऊस पडत आहे. त्यामुळे पंचगंगा नदीची पाणीपातळी रात्रीत तब्बल सहा फुटांनी वाढली. पाऊस असाच सुरु राहिल्यास पंचगंगेच्या काठावर असलेल्या गावांना धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. सांगली जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे नद्यांना पूर आला आहे. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात २५ पूल पाण्याखाली गेले आहेत. तर तब्बल १८ रस्त्यांवरील वाहतूक बंद झाली आहे. याशिवाय, अनेक वस्त्यांमध्ये पाणी शिरले असून अनेक भागाचा संपर्क तुटला आहे. तसेच मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील शेकडो हेक्टर शेती पाण्याखाली गेली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा आणखी तीव्र झाला आहे. त्यामुळे देशातल्या अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे. सिंधुदुर्गातही परतीच्या मुसळधार पावसाने भातशेती उत्पादक शेतकरी अडचणीत सापडले आहेत. डोळ्यासमोर बहरलेले पिवळे सोने निसर्गाच्या लहरीपणामुळे मातीमोल होत असल्याने बळीराजा संकटात सापडला आहे.

एकीकडे शेतकरी परतीच्या पावसामुळे अडचणीत सापडला असून दुसरीकडे मच्छीमारही संकटात आहे. अगोदरच वातावरणातील बदलामुळे मासेमारीसाठी गेल्यावर मासे मिळत नाही त्यात आता समुद्रात निर्माण झालेल्या वादळ सदृश्य परिस्थितीमुळे मासेमारीसाठी समुद्रात न जाण्याचे निर्देश मच्छीमारांना देण्यात आलेले आहेत. त्यामुळे स्थानिक बोटीसह परराज्यातील शेकडो बोटी देवगड बंदरात अडकून पडल्या आहेत. पुणे शहरात तर बुधवारी रात्री धुमाकूळ घातलेल्या पावसाने गेल्या दहा वर्षातील सर्व विक्रम मोडले. रात्री नऊ ते अकरा या दोन तासात संपूर्ण शहरात धुवाँधार पाऊस पडल्याने पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. कात्रज भागात बुधवारी रात्री अकरा वाजेपर्यंत तब्बल १५१ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. तर शिवाजीनगरला ९६ मिलीमीटर पाऊस पडला. कात्रज तलाव, टांगेवाला कॉलनीसह आणि अरणेश्वर परिसरातील नागरिकांना घरात पाणी शिरल्याने प्रशासनाला महापालिकेच्या शाळेत हलवावे लागले. १८ ऑक्टोबर रोजी आणखी एक कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होणार असून त्यामुळे पावसाळा लांबण्याची शक्यता आहे. २० ऑक्टोबरपर्यंत पाऊस सुरू राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे येत्या दोन–तीन दिवसात निसर्ग काय चमत्कार दाखवतो त्याची भीती कायम आहे. राज्यभर मुंबई, पुण्यासह अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाने हजेरी लावली.

आजही राज्यात असात मुसळधार पावसाचा इशारा हवामान खात्याकडून देण्यात आला आहे. उत्तर कोकणासह मुंबई आणि ठाण्यासाठी रेड अर्लट जारी करण्यात आला आहे, तर अतिमुसळधार पावसाचा इशारा दिला आहे. एकंदरच २०२० हे वर्ष कोरोना महामारीने ग्रासले असतानाच आता आधी अतिवृष्टी, चक्रीवादळ आणि आता परतीच्या पावसाने शेतक?्यांची अक्षरश: दैना केली आहे. पावासाने ओढ दिल्याने यंदा रब्बी पिकाचीही दुबार पेरणी करुन शेतकऱ्याच्या डोक्यावरचा भार वाढलाच होता, त्यातच आता या मोसमातील पीकेही वाया गेली आहेत. यानंतर बाजारात शेतमालाला भाव मिळेलच याची खात्री नाही. शेतीपिके अशी वाया गेल्याने यंदा बाजारात शेतमालाच्या किंमती वाढण्याची, साठा करुन ठेवण्याची प्रक्रियाही मोठ्या प्रमाणात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. साठेबाजांवर कोणाचेच नियंत्रण नसते हा आजवरचा अनुभव आहे. त्यामुळे यंदाही शेतकरीच नाही तर ग्राहकांचेही फार मोठे हाल होणार आहेत.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# खुला प्रवर्ग म्हणजे सवर्ण नव्हे



**नागपूर–** राज्यघटनेत सवर्णांसाठी कोणत्याही प्रकारचे आरक्षण नाही. त्यामुळे खुल्या प्रवर्गातील आरक्षित जागा म्हणजे सवर्णांसाठीचे आरक्षण असा त्याचा अर्थ होत नाही. खुल्या प्रवर्गातील जागा या कोणत्याही जात, धर्म, पंथातील गुणवंतांसाठीच्या जागा आहेत, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला.

त्यानुसार एका भटक्या जामातीतील महिलेची खुल्या प्रवर्गात नियुक्ती करण्याचा आदेश प्रिंटिंग संचालकांना दिला.प्रिंटिंग ॲण्ड बाइंडर संचालकांनी बाइंडर या पदाच्या दहा जागांसाठी जाहीरात काढली होती. त्यापैकी एक जागा भटक्या विमुक्त जमातीसाठी आणी दोन पदे खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी राखीव होती. या पदासाठी झालेल्या लेखी परीक्षेत शांताबाई डोईफोडे या पात्र ठरल्या होत्या. पण डोईफोडे यांची नेमणूक करण्यात आली नाही. डोईफोडे भटक्या विमुक्त जमातीच्या गुणवत्ता यादीत खालच्या क्रमांकावर होत्या, परंतु खुल्या प्रवर्गातील गुणवत्ता यादीत त्यांचा वरचा क्रमांक होता. त्यामुळे खुल्या प्रवर्गातील महिलांसाठींच्या रिक्त जागांवर गुणवत्तेच्या आधारे नियुक्त करावे, अशी मागणी डोईफोडे यांनी केली. परंतु प्रिटिंग ॲण्ड बाइंडर संचालकांनी मागणी फेटाळून लावली. डोईफोडे यांना खुल्या प्रवर्गात स्पर्धा करता येणार नाही, कारण खुला प्रवर्गातील महिला म्हणजे ज्यांच्यासाठी कोणतेही आरक्षण नाही, अशा प्रवर्गातील महिला असा अर्थ संचालकांनी काढला.

त्या पदाकरिता इतर महिला उमेदवार नसल्याने संचालकांनी अजय येवले या व्यक्तीची एका पदावर नियुक्ती केली. बाइंडर पदावर नियुक्ती नाकारल्याने डोईफडे यांनी महाराष्ट्र प्रशासकीय लवादाकडे याचिका दाखल केली. तेव्हा महाराष्ट्र प्रशासकीय लवादाने देखील खुल्या प्रवर्गातील महिलांच्या आरक्षित जागेवर भटक्या विमुक्त महिलेला नियुक्ती देता येणार नाही, कारण खुला प्रवर्ग म्हणजे सवर्णांसाठी आरक्षित जागा होय, असा अर्थ काढला. तसेच डोईफोडे यांची याचिका फेटाळली. मॅटच्या निर्णयाला डोईफोडे यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले, त्यावर न्या. सुनील शुक्रे आणि न्या. रोहित देव यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. याचिकाकर्त्यांच्य वतीने बाजू मांडताना वरिष्ठ अधिवक्ता मोहन सुदामे यांनी सुप्रीम कोर्टाने आरक्षणाबाबत निर्धारित केलेल्या विविध कायदेशीर बाबी सादर केल्या, खुला प्रवर्ग म्हणजे सगळ्याच प्रवर्गांना गुणवत्तेच्या आधारे नोकरी, रोजगार, शिक्षण व इतर फायदे घेण्याचा अधिकार आहे.परंतु, मॅटने केलेली व्याख्या ही घटनात्मक नाही, असे त्यांनी नमूद केले.

हायकोर्टाने देखील प्रिटिंग संचालक व मॅटने केलेल्या खुल्या प्रवर्गाच्या व्याख्या आणि काढलेल्या अर्थावर टीका केली आहे. खुला प्रवर्गातील महिला याचा अर्थ कोणत्याही जात, धर्म अथवा पंथातील महिला त्या पदाकरिता स्पर्धा करू शकते, तसेच तिथे गुणवत्तेवर नियुक्त होऊ शकते, असे नमूद करीत हायकोर्टाने डोईफोडे यांची याचिका मंजूर केली. तसेच त्यांना बाइंडर पदावर नियुक्त करण्याचा आदेश दिला. मात्र, अजय येवले या व्यक्तीच्या नियुक्तीला तीन वर्ष झाली आहे, त्यांनी त्या पदावर काम केले असल्याने त्यांची नियुक्तीही कायम ठेवण्याचा आदेश हायकोर्टाने मानवी दृष्टीकोन समोर ठेवत दिला.

## केंद्र सरकारच्या योजना गाव पातळीपर्यंत पदाधिकाऱ्यांची पोहोचवाने-इंजि.बडोले



**अर्जुनी मोर. :–** भारतीय जनता पाटीची विचारधारा ही सर्वसामान्य माणसाच्या विकासाची आहे. केंद्र सरकार अनेक विकासात्मक उपक्रम राबवून थेट योजना गोरगरीबा पर्यंत पोहचवित आहे. राज्यात मागील फडणवीस सरकारच्या काळातही शेतकरी शेतमजूर व अन्य गोरगरिबांसाठी अनेक कल्याणकारी योजना व धोरणात्मक निर्णय घेण्यात आले. सर्वत्र राज्यात सुबत्ता होती. आता मात्र तीन तिगडी सरकारमुळे अनेक विकासाची व गोरगरिबांची कामे अडकली आहेत.

गोंदिया जिल्ह्यात रेतीचा विषय गंभीर होत चालला आहे. सहा महिन्यापासून निराधारांना अनुदान दिले जात नाही, बाधित शेतकऱ्यांना मदत देण्यास विलंब होत आहे. अनेक विकासात्मक व धोरणात्मक कार्यक्रमात सध्याचे राज्य सरकार अपयशी ठरत आहे. गोंदिया जिल्ह्यात भाजपाचे लोकांना व संस्थांना त्रास देण्याचे काम सध्या सुरू आहे. अर्जुनी मोरगाव तालुका हा भाजपचा गड राहिला आहे. पुढे होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती तथा सहकारी संस्थांच्या निवडणुकीत भाजपाचा गड कायम ठेवण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांची आहे.

जिल्ह्यातील भाजपाचा सर्वसामान्य कार्यकर्ता पक्षनिष्ठ आहे. ही ताकद आपल्याला अशीच कायम ठेवून पुढे येणाऱ्या निवडणुका जिंकायचे आहे त्यासाठी पक्ष कार्यकर्त्यांनी आतापासूनच कामाला लागावे. नेते पदाधिकारी व कार्यकर्ते यांची नाळ जोडून ठेवणे हीच भाजपाची परंपरा असल्याचे आवाहन माजी पालकमंत्री इंजि. राजकुमार बडोले यांनी केले आहे.

त्रिमूर्ती पेट्रोल पंप अर्जुनी–मोर येथील डॉ.गजानन डोंगरवार यांचे येथे सुरू करण्यात आलेल्या भाजपा जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थानावरुन माजी मंत्री राजकुमार बडोले बोलत होते. कार्यालयाचे उद्घाटन खासदार सुनील मेंढे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रदेश कार्यकारणी सदस्य रचना गहाणे, तालुका भाजपा अध्यक्ष अरविंद शिवनकर, ज्येष्ठ नेते नामदेव कापगते, डॉक्टर गजानन डोंगरवार, केवळ राम पुस्तोडे, ओबीसी मोर्चा जिल्हा आघाडी अध्यक्ष उमाकांत ढेंगे, रामदास कोहाडकर, प्रकाश गहाणे, विजया कापगते, लक्ष्मीकांत धानगाये, जिल्हा महामंत्री लायकराम भेंडारकर, प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रास्ताविकातून भाजपा तालुका अध्यक्ष अरविंद शिवणकर यांनी तालुक्यात सर्व कार्यकारिणी तयार करून सर्व पदाधिकारी यांची नियुक्ती करण्यात आल्याचे सांगून तालुक्याचा अहवाल सादर केला. संचालन गोंदिया जिल्हा महासचिव लायकराम भेंडारकर यांनी केले. सभेला तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ग्रामस्तरीय समितीची मदत घ्या

**देवरी:** जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या कुटुंबांना साहाय्य करण्यासाठी खावटी अनुदान योजना २०२०–२१ या एका वर्षासाठी राज्य शासनाने सुरु केली आहे. ही योजना शंभर टक्के अनुदानावर आहे. या योजनेविषयी कुठलीही शंका व मदत हवी असल्यास ग्रामस्तरीय समितीची मदत घ्या, असे आवाहन आमदार सहेषराम कोरोटे यांनी केले आहे. कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभुमीवर अनुसूचित जमातीच्या कुटुंबांना सहाय्य करण्यासाठी संपूर्ण राज्यात खावटी अनुदान योजना एक वर्षासाठी सुरु केली आहे. या योजनेचा लाभ ५० टक्के रोख व ५० टक्के वस्तू अनुदान स्वरुपात देण्यास शासन स्तरावरुन मान्यता देण्यात आली आहे. गोंदिया जिलह्यातील सर्व असुसृचित जमातीच्या कुटुंबियांना खावटी अनुदान योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या कुटुंबांना या योजनेचा लाभ मिळावा याकरिता गावनिहाय व तालुकानिहाय लाभार्थ्यांची यादी निश्चित करण्याकरिता ग्रामपातळीवर ग्रामपंचायत स्तरावर सरपंच, तलाठी, ग्रामसेवक व पोलीस पाटील यांची एक समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने गोंदिया जिल्ह्यातील संपूर्ण आदिवासी कुटुंबांना असे आवाहन करण्यात येते की गोंदिया जिल्ह्यातील ग्रामपंचायत स्तरावर चावडी वाचन केले जाणार आहे व लाभार्थ्यांची नावे निश्चित करण्यात येणार असल्याने चावडी वाचनात सहभाग घेऊन पात्र कुटुंब प्रमुखांनी आपल्या नावाची खातरजमा करुन घ्यावी तसेच पात्र कुटुंब प्रमुखाचे नाव यादीत समाविष्ट नसल्यास ग्राम स्तरीय समितीकडून आपण चौकशी करुन आपले नाव संबंधित यादीत समाविष्ट करुन घ्यावे. ही योजना शंभर टक्के अनुदानावर आहे. या योजनेविषयी कुठलीही शंका व मदत हवी असल्यास ग्रामस्तरीय समितीची मदत घ्या.

## सुकलेल्या रोपट्यांचाही खर्च उचलला



**सालेकसा:** सालेकसा नगरपंचायतीने २०१९–२० या आर्थिक वर्षात नगरपंचायतीच्या हद्दीत वृक्ष लागवड केली. त्याकरिता २० लाख रुपयांच्या अंदाजपत्रकाला मंजूरी देण्यात आली होती. झाडे लागवडीचे कंत्राट त्रयस्थ संस्थेला देण्यात आले होते. लागवड करतानाी यापैकी अर्धे रोपटे सुकले होते. त्याची तक्रार नगरसेविका वंदना क्षीरसागर यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली. त्यानंतर देखील कसल्याही प्रकारची चौकशी झाली नसल्याने विभागीय आयुक्तांकडे दादा मागितली. मात्र, अद्याप या विषयावर तोडगा निघाला नाही. त्यामुळे मुख्याधिकाऱ्याला अभय नेमके कुणाचे, असा सवाल नगरसेविका वंदना क्षीरसागर यांनी उपस्थित केला आहे.

सालेकसा नगरपंचायत अस्तित्वात आल्यापासून ही नगरपंचायत वादातीत आहे. सालेकसा जरी नाव असले तरी सगळ्यात मोठे आणि सर्व कार्यालय असलेले गाव आमगाव खुर्द आहे. मात्र या नगरपंचायतीत आमगाव खुर्दचा समावेश न करता परिसरातील लहान–लहान गावांचा समावेश करण्यात आला होता. आमगाव खुर्द गावाचा नगरपंचायतीत समावेश व्हावा याकरिता आमगाव खुर्दच्या नागरिकांनी न्यायालयीन लढा दिला. अखेर न्यायालयाच्या निर्णयामुळे आमगाव खुर्द हे सालेकसा नगरपंचायतीत सामील झाले. परंतु गेल्या काही दिवसांपासून ही नगरपंचायत पुन्हा वादात अडकली. नगरसेविका वंदना क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे मुख्याधिकाऱ्यांच्या विरोधात तक्रार केली होती. नगरपंचायतीच्या हद्दीत एक हजार वृक्ष लागवड करण्याकरिता २० लाख रुपयांच्या अंदाजपत्रकाला मंजुरी देण्यात आली.

वृक्ष लागवडीचे काम त्रयस्थ संस्थेला देण्यात आले. मात्र वृक्ष लागवड होताना त्यातील अर्धे झाडे मेलेली लावण्यात आली. त्याची तक्रार त्याचवेळी मुख्याधिकारी यांच्याकडे करण्यात आली. मात्र मुख्याधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले.

त्याचप्रकारे मुख्याधिकारी यांच्याविरोधात नगरसेविका श्रीमती क्षीरसागर यांनी भारत स्वच्छता अभियान २०१९ मध्ये मिळालेल्या निधीची अफरातफर, सामान्य निधीच्या हिशेबातील गैरप्रकार, १५ ऑगस्ट, २६ जानेवारीच्या सभेचा अवाजवी खर्च अशा अनेक त्रकारी नगरसेविका वंदना क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केल्या होत्य. मात्र जिल्हाधिकारी यांनी या प्रकरणात ज्यांची तक्रार करण्यात आली होती त्यांच्याकडेच या प्रकरणाचा तपास आणि चौकशी सोपविली.

त्यामुळे मुख्याधिकारी यांनी आपली बाजू सावरण्याकरिता जिल्हाधिकारी यांना खुलासा सादर केला. मात्र तक्रारकर्त्या नगरसेविकेला त्या संदर्भात साधी माहिती देण्यात आली नाही. त्यामुळे नगरसेविका वंदना क्षीरसागर यांनी आपल्याला न्याय मिळून दोषींवर कारवाई व्हावी, यासंदर्भाचे विभागीय आयुक्त यांच्याकडे तक्रार केली. परंतु ती तक्रारदेखील केराच्या टोपलीत टाकण्यात आली.

त्यामुळे ज्या मुख्याधिकारी यांच्यावर आरोप करण्यात आले ते खरे की ज्यांनी आरोप केले त्या नगरसेविका यांची बाजू बरोबर हे येणारा काळ ठरवेल. यासंदर्भात मुख्याधिकारी यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता झाला नाही.

### मंडप-डेकोरेशनवाल्यांचे बेहाल

**चिचगड–**नवरात्रोत्सव सुरु झाली आहे. कोरोना व्हायरसच्या वाढत्या प्रादुर्भावामुळं उत्साह काहीसा कमी असला तरीही, आदिशक्तीच्या आगमनासाठी सारे भक्त उत्सुकतेत होते. या परिस्थितीमध्ये कोरोनाचा प्रादुर्भावही नियंत्रणात रहावा यासाठी प्रशासना तर्फे नियमावली जाहीर करण्यात आली आहे.नवरात्र उत्सवा करीता ढोल–तास्याच्या गजरात आगमन व्हायचे , हजारो ऊपयांचे मंडप ऊभारले जायचे, लोकांच्या मनोरंजनाकरीता झाक्या लावल्या जायच्या , हजारो भक्तार्ची भिड देवरी येथिल धुकेश्वरी मंदीरात दिसायची , हजारो दुकाने धुकेश्वरी मंदीराच्या आवारात लागायच्या, परंतु यावषी सगळ्या मंडप–डेकारेसन,व्यापरी,छोटे मोठे दुकानंदार यांचे लाखो रुपयांचे नुकसान कोरोना सारख्या महामारी मुळे झाले आहे.

## मत्स्यव्यवसायांच्या विकासासाठी झिंगा प्रकल्प राबविणार -खासदार प्रफुल पटेल



**साकोली:–** राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते राज्यसभा खासदार प्रफुलभाई पटेल हे गेल्या दोन दिवसापासून आपल्या गृह जिल्ह्यात (गोंदिया–भंडारा)दौऱ्यावर असून यावेळी त्यांनी विविध ठिकाणी भेट देत अधिकारी व नागरिकांशी चर्चा केली. त्यातच सोमवारला (दि.१९) खासदार पटेल यांनी साकोली तालुक्यातील चारगावं येथील मालगुजारी तलावाला भेट देत मच्छिमार बांधवांशी संवाद साधला आणि त्यांच्यासोबत चर्चा करतांना मच्छिमार समाजाच्या व्यवसायाला वृध्दींगत करण्यासाठी झिंगा प्रकल्प सुरु करण्यासंदर्भात राज्यसरकारसोबत लवकरच चर्चा करण्याचे आश्वासन देत ग्रामीण विकासाला यापुढे महत्व द्यायचे असल्याचे विचार व्यक्त केले.

यावेळी त्यांच्यासोबत माजी आमदार राजेन्द्र जैन, अर्जुनी मोरगाव मतदारसंघाचे आमदार मनोहर चंद्रीकापुरे, भंडारा जिला मध्य. सहकारी बँक अध्यक्ष सुनिल फुंडे, बँक उपाध्यक्ष सदाशिव वलथरे, सुधीरभाऊ केदार, माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाधर परशुरामकर, डॉ. अविनाश काशीवर, बँक संचालक अजय (बाळा) हलमारे, श्याम नागोसे व मासेमारी व्यवसाय करणारे बांधव व समाजातील लोक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. जय अम्बे मत्स्य पालन सहकारी संस्था चारगांवच्या वतीने खासदार प्रफुल पटेल यांचा शाल व श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला.

## रेशनच्या तांदूळ घोटाळ्याप्रकरणी केंद्रीय पथक गोंदियात

**गोंदिया:** नागपूरात सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत वितरित करण्यात येणाऱ्या तांदळाचा काळाबाजार गुन्हे शाखेने उघड पाडला होता. त्याचे धागेदोरे गोंदियात असल्याचे गुन्हे शाखेच्या तपासात समोर आले होते. त्या अनुषंगाने सर्वात प्रथम रेशनच्या तांदुळ घोटाळ्यातील आरोपींचे गोंदियात कनेक्शन या मथळ्याखाली बेरार टाईम्सने बातमी प्रकाशित केली होती. नागपूरातील या रेशन घोटाळ्याची चौकशी आणि बातमीचा आधार घेत केंद्रीय पथकाने गेल्या आठवड्यात गोंदियात येवून तपासणी केली. या प्रकरणात येथील काही बडे व्यवसायी अडकण्याची शक्यता आहे. यामध्ये तांदुळ पूरवठा करणाऱ्या काही मिलर्सचा समावेश असल्याची चर्चा आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत तांदळाची मोठ्या प्रमाणात अफरातफर होत आहे. त्याचबरोबर मार्केटिंग फेडरेशनच्या वतीने हमीभाव खरेदी केंद्रावर धानाची खरेदी करण्यात येते. त्यानंतर त्या धानाची भरडाई करण्यात येते. भरडाई करण्याचे काम जिल्ह्यातील १८८ रईस मिलर्सला देण्यात आले होते. त्यातील ही जणांनी भरडाई केलेला तांदूळ एफसीआयच्या गोदामात न पोहोचविता त्या तांदळावर पुन्हा प्रक्रिया करुन चढ्या दराने बाजारात विकला. त्याठिकाणी सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत येणारा तांदुळ खरेदी करुन तोच निकृष्ठ दर्जाचा तांदूळ एफसीआयच्या गोदामात जमा केला. त्याला त्या गोदामात असणाऱ्या गुणनियंत्रकांनी देखील पास केला होता.

असाच प्रकार नागपूरात देखील घडला. नागपूर गुन्हे शाखेच्या पथकाने चेतन मदान याच्या फ्री ऑक्ट्रॉय झोनमधील गोदामावर छापा घालून ४० टन तांदूळ जप्त केला. त्या प्रकरणी सात जणांना अटक केली. त्याच बातमीचा आधार घेत केंद्रीय चमू सहा दिवसांपुर्वी गोंदियात पोहोचली. त्यांनी सर्व आढावा घेत गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यामुळे या प्रकरणात पुरवठा विभाग आणि भरडाई करुन तंदुळ जमा करणारे राईस मिलर्स देखील या प्रकरणात अडकण्याची दाट शक्यता आहे. हे प्रकरण उलगडल्यास गेल्या कित्येक वर्षापासून काळाबाजारी आणि नफेखोरी करणारे पांढरपेशांचा गोरखधंदा उघडकीस येईल यात तिळमात्र शंका नाही.

### जात प्रमाणपत्र पडताळणी : ऑनलाईन प्रक्रिया सुरु

**गोंदिया :** जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती गोंदिया येथे सन २०२०–२१ या शैक्षणिक वर्षात १२ वी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांसाठी १ ऑगस्ट २०२० पासून ऑनलाईन प्रक्रिया सुरु झाली आहे. त्यामुळे ऑनलाईन प्रस्ताव सादर करतांना विद्यार्थी/अर्जदार यांनी पुढील बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे. Bartievalidity.maharashtra.gov.in या वेबसाईटवरती अर्ज भरावे. ऑनलाईन फॉर्म भरतांना सर्व मुळ कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. जसे– जात प्रमाणपत्र, फॉर्म नं.१५ अ, Affidavit form, Affidavit form २३, वडिलांची मुळ ढउ, आजोबांची मुळ ढउ/ प्रवर्गानुसार महसुली वा जन्म नोंदी पुरावे (अ.जा. १९५०, ओबीसी/एस.बी.सी. १९६७, व्हिजे/एन.टी.–१९६१).

## करिअर:क्लिनिकल इंजिनीअरिंग

क्लिनिकल इंजिनीअरिंग असा एक विषय नव्याने पुढे आ–लेला आहे. वैद्यकीय व्यवसायाशी संबंधित असलेल्या अभियांत्रिकी स्वरूपाच्या कामांचे शिक्षण देण्याकरिता ही नवी विद्या शाखा सुरू करण्यात आलेली आहे. तशी ही विद्या शाखा नवी असल्यामुळे तिच्याविषयी अजून समाजातही फारशी जागृती नाही आणि शिक्षण संस्थांनीही हा अभ्यासक्रम फार उत्साहाने सुरू केलेला नाही. देशातल्या फार कमी संस्थांमध्ये तो सुरू आहे. त्याच्याविषयी जागृती कमी असल्यामुळे त्याकडे फारशी मुले वळत नाहीत असे मात्र काही नाही. कारण सध्या इंजिनीअरिंग या शब्दाची जादूच अशी काही निर्माण झालेली आहे आणि चांगल्या शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळणे दुरापास्त असल्यामुळे इंजिनिअरींग अशा शब्दाचा उल्लेख असलेल्या कोणत्याही अभ्यासक्रमाकडे मुलांचा ओढा असतो. तसा याही शाखेकडे आहे.



तमिळनाडूमध्ये तीन संस्थांनी मिळून हा अभ्यासक्रम सुरू केलेला आहे. या तीन संस्था म्हणजे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मद्रास, श्री चित्र तिरुनल इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस ?न्ड टेक्नॉलॉजी त्रिवेंद्रम तसेच ख्रिश्चन मेडिकल कॉलेज वेल्लोर या होत. या तिन्ही संस्था मान्यताप्राप्त असून, त्यांनी क्लिनिकल इंजिनीअरिंगचा एम.टेक असा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केलेला आहे. या अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्य असे की, तो विद्यार्थ्यांना या तिन्ही संस्थांमध्ये थोडा थोडा काळ जाऊन शिकावा लागतो. हा अभ्यासक्रम अडीच वर्षांचा असून त्यात क्लिनिकल अटॅचमेंट हा विषय ख्रिश्चन मेडिकल कॉलेजमध्ये शिकावा लागतो. त्याचबरोबर अन्य विषय शिकण्यासाठी अन्य दोन संस्थांत जावे लागते.

या अभ्यासक्रमात बायोमटेरियल्स, मॉल्युकिलर ?न्ड सेल बायालॉजी, बायोमेकॅनिक्स, फंक्शनल अनाटॉमी ॲन्ड फिजिओलॉजी, बायोमेडिकल इमेजिंग सिस्टीम्स, मेडिकल डिव्हाईस टेक्नॉलॉजी त्याचबरोबर क्रिटीकल केअर इन्स्ट्रुमेंटेशन इत्यादी विषयांचा समावेश आहे. या अभ्यासक्रमातून रुग्णालयात वापरली जाणारी विविध प्रकारची गुंतागुंतीची उपकरणे कशी वापरावीत आणि त्यांची देखभाल कशी करावी याचे शिक्षण दिले जाते.

ही उपकरणे खरेदी करताना सुद्धा अशा पदवीधरांचा सल्ला घेतला जातो. ही सारी उपकरणे अतीशय गुंतागुंतीची आणि संवेदनशील असल्यामुळे त्यांचा सुरक्षित वापर कसा करावा, यावर सातत्याने लक्ष द्यावे लागते. त्यामध्ये काही गडबड झाल्यास त्या साधनाची बदनामी होत नाही, पण संस्थेची मात्र बदनामी होते. याचा अर्थ संस्थेची प्रतिष्ठा या अभियंत्याच्या हातात असते. या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणार्या उमेदवाराकडे बी.ई. किंवा बी.टेक या पैकी एक पदवी असणे जरूरीचे आहे.

page 46.indd 2 10/20/2020, 6:26 PM

# नक्षल व अतिरिक्त घरभाडे भत्ता लवकरच लागू करणार–मुकाअ डांगे



**गोंदिया :** महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने शिक्षकांच्या प्रलंबित २५ मागण्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिप डांगे यांना दिले निवेदन देवून तक्रार निवारण सभेत चर्चा घडवून आणली. यावेळी नक्षलभत्ता कमालमर्यादेत १५०० रूपये व अतिरिक्त घरभाडे संदर्भातील प्रश्न प्राधान्याने सोडविला जाईल असे आश्वासन डांगे यांनी तक्रार निवारण सभेत दिले.

सभेला नरेश भांडारकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी आर. एल.पुराम, मुख्य लेखा व वित्त अधिकारी अमृता परदेशी, शिक्षणाधिकारी (प्राथ.) राजकुमार हिवारे, उपशिक्षणाधिकारी (प्राथ.) आर.पी. रामटेके, शिक्षण विस्तार अधिकारी डी.एम. मालाधारी, अधीक्षक जनबंधू व इतर कर्मचारी उपस्थित होते. चर्चेत जीपीएफ–डिसीपीएस मार्च २०२० पर्यतचा हिशोब मिळणे हा प्रश्न आक्रमकपणे ठेवण्यात आला. यावर डांगे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली व १० जणांचे यूनिट तयार करून कायमस्वरूपी प्रश्न निकाली काढले जाणार असल्याचे सांगीतले.तसेच सीएमपी वेतनप्रणाली लागू करणे, उच्चश्रेणी मुख्याध्यापक, विषय शिक्षक व शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यात यावी, २ जानेवारी रोजी कर्मचाऱ्यांना वेतनवाढ लावणे, विषय शिक्षकांना वेतनश्रेणी लागू करण्यात यावी, १२ वर्षे झालेल्यांना चटोपाध्याय वेतन श्रेणी व २४ वर्षे झालेल्यांना निवड श्रेणी मंजूर करण्यात यावी, उच्च परिक्षेला बसण्याची परवानगी व कार्येत्तर परवानगी आदेश काढण्यात यावे, ४% सादीलवार राशी शाळांना देण्यात यावी, २००९ नंतर नोकरीत लागलेल्या शिक्षकांना सेवेत कायम करण्यात यावे, कोविड–१९ अंतर्गत कामावर असताना मरण पावलेल्या शिक्षकांना विमा संरक्षण लाभ देण्यात यावा, जिल्हा व राज्य आदर्श शिक्षक सेवानिवृत्त झाल्यानंतर वेतन वाढीची राशी वसूल करण्यात येवू नये, ओबीसी–एनटी प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे (२०१९–२०) कोरोनामुळे राहिलेले प्रस्ताव समाज कल्याण विभागात घेण्यात यावे, पदविधर शिक्षकांच्या वेतनातील तफावत दूर करणे, सेवापूस्तक गहाळ झालेल्या शिक्षकांना नवीन सेवापूस्तक मंजूर करून देणे आदी प्रश्नांवर चर्चा घडविण्यात आली. सर्व प्रश्न काळजीपूर्वक सोडविण्याचे आश्वासन डांगे यांनी दिले.

बैठकीला शिक्षक कृती महासंघाचे प्राचार्य व्ही.डी. मेश्राम, आनंद पुंजे , रमेशकुमार तनवाणी, डी.टी. कावळे, गुणेश्वर फुंडे, रेशीम कापगते, मिलिंद मेश्राम, असिम बँनजी, जी.एम. खान, प्राचार्य बी.डब्ल्यू. कटरे, प्रमेश बिसेन, शिक्षक सहकार संघटनेचे रवीद्र अंबुले, प्रदिपकुमार मेश्राम, प्रदिप गणवीर, शिक्षक भारतीचे महेंद्र सोनवाने, राजेंद्रकुमार कडव, एल.यु. खोब्रागडे, मुकेश रहागडाले, राजानंद वैद्य, हरिराम येळणे, जी.एस. मौदेकर, सुरेंद्र जगने, सुरेंद्र गौतम, बी एफ बालपांडे, एम.जे. बढे, बी.ए.जांगडे, एच.बी. मेंढे, एस.यु. वंजारी, शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष विरेंद्र कटरे, अनिरुध्द मेश्राम, केदार गोटेफोडे, नुतन बांगरे, शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष मनोज दिक्षित, सरचिटणीस एल.यू. खोब्रागडे, किशोर डोंगरवार, संदीप तिडके, एन.बी.बिसेन आदींनी २५ प्रश्नांवर चर्चा घडवून आणली.

# आरक्षण सोडतीचा वाजला बिगुल



**गोंदिया:** नोव्हेंबर ते डिसेंबर दरम्यान कालावधी संपणाऱ्या नगरपंचायतींच्या प्रभार रचना, आरक्षण रचना, आरक्षण सोडतीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केला. जिल्ह्यातील सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगाव, देवरी आणि गोरेगाव या नगर पंचायतीमध्ये हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्याकरिताची नियमावली १२ ऑक्टोबर रोजी जाहीर करण्यात आली.

जिल्ह्यातील सडक अर्जुनी, अर्जुनी मोरगव, देवरी आणि गोरेगाव नगर पंचायतीची निवडणूक १ नोव्हेंबर २०१५ मध्ये पार पडली होती. या नगर पंचायत पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ २९ नोव्हेंबर २०२० पर्यंत आहे. सध्या कोरोना विषाणूचा संसर्ग सुरु आहे. त्यामुळे निवडणूका नियत वेळेत पार पडतील की नाही, अशी शंका होती. मात्र केंद्र आणि राज्य शासनाने कोरोना संक्रमण रोखण्याकरिता घालून दिलेल्या प्रतिबंधक नियमांच्या अधीन राहून निवडणूक कार्यक्रमाची प्राथमिक अमलबजावणी करण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाने दिले आहेत.

निवडणूक आयोगाचे अवर सचिव संजय सावंत यांच्या स्वाक्षरीनिशी १२ ऑक्टोबर रोजी निर्गमित पत्रात प्रभाग रचना आणि आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे.

निर्गमित करण्यात आलेल्या पत्रात म्हटले की, २१ ऑक्टोबर २०२० रोजी प्रभाग रचना करावयाची आहे. २९ ऑक्टोबर रोजी प्रारुप प्रभाग रचना प्रस्तावाला मान्यता, ३ नोव्हेंबर सदस्य पदाचे आरक्षण सोडतीचे नोटीस प्रसिद्ध करणे, १० नोव्हेंबर रोजी आरक्षण सोडतय काढणे, १८ ते २६ नोव्हेंबर दरम्यान हरकती व सुचना मागविणे, ४ डिसेंबरला अंतिम प्रभाग रचनेला मान्यता देण्यात येणार आहे. या संपूर्ण कार्यक्रमादरम्यान केंद्र आणि राज्य शासनाने कोरोना विषाणू संक्रमण रोखण्याकरिता जे निकष ठरवून देण्यात आले आहेत. त्या निकषांचे तंतोतंत पालन करणे गरजेचे आहे.

निवडणुकीकरिता २०११ च्या जनगणनेतील आकडेवारी ग्रहित धरावी लागणार आहे. प्रभाग रचना करताना गूगल मॅप वापरुन त्यावर प्रगणक गट दर्शविण्यात यावे. मुख्याधिकारी यांनी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आरक्षणासह प्रारुप प्रभाग रचना प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश देखील देण्यात आले आहेत.

# भूमिपूजन कार्यक्रमात नगरसेवकांना डावलले,माजी नगराध्यक्ष सुमन बिसेन यांची पालकमंत्री व जिल्हाधिका-यांकडे तक्रार

**देवरी:–** येथील नगरपंचायत कडून दि.१५ ऑँक्टोंबरला विविध विकास कामांचे भूमिपूजन कार्यक्रम पार पडले. त्या कार्यक्रमाला निम्यापेक्षा कमी नगरसेवकांना आमंत्रण दिल्याचा आरोप करीत माजी नगराध्यक्ष सुमन बिसेन यांनी पालकमंत्री व जिल्हाधिका–यांकडे तक्रार केली आहे.

माजी नगराध्यक्ष सुमन बिसेन या सध्या प्रभाग क. ८ च्या नगरसेविका असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ६ नगरसेवक भाजपात गेल्याने सध्या देवरी नगरपंचायतमध्ये भाजपाची सत्ता आहे. सुमन बिसेन नगराध्यक्ष असताना कोणत्याही विकास कामाचे भूमिपूजन कार्यक्रम पत्रिका छापून भाजपाचे माजी आमदार संजय पुराम यांच्या हस्ते पार पाडले गेले. देवरी शहरातील विकास कामामध्ये कोणताही पक्ष भेद न करता सर्व प्रतिनिर्धीना मानसन्मान केला असे आपल्या पत्रात म्हटले आहे.

देवरी शहरातील विविध विकास कामाच्या भूमिपूजन कार्यक्रम मागील महिन्यात घेण्यात येणार होते.सदर कार्यक्रम स्थानिक आमदार सहसराम कोरेटे यांच्या हस्ते घेण्याचे ठरविले होते मात्र ते कार्यक्रम रद्द करण्यात आले. परंतु आमदार विरोधी पक्षाचे असल्याने त्यांनाही बोलावण्यात आले नाही.तसेच नगराध्यक्ष यांच्याकडून पूर्वसूचना न देता दि. १५ ऑक्टोंबरला नगरपंचायत कार्यालय देवरी तर्फे अगदी वेळेवर दुपारी ३.३० वाजेच्या कार्यक्रमासाठी व्हाट्सअप गुपवर सकाळी ११.२६ मिनिटांनी मेसेज टाकून शहरातील विविध विकास कामांचे भूमिपूजन कार्यक्रम ४ लोकांच्या उपस्थितीत पार पाडण्यात आल्याचे कळले. त्यामुळे सदर कार्यक्रमापासून वंचित रहावे लागले.यात नगरपंचायत प्रशासनाकडून जनप्रतिनिधीचा अपमान करण्यात आल्याचे श्रीमती बिसेन यांनी आरोप पत्राद्वारे केला आहे .

मुख्याधिकारी यांना संबंधित कार्यक्रमाच्या बाबतीत विचारले असता त्यांनी नगराध्यक्ष यांच्या आदेशाने घेण्यात आल्याचे व त्यासंबंधी सूचना व्हाट्सअप गुपच्या माध्यमातून सार्वजनिक बांधकाम अभियंता श्री.झिरपे यांच्याकडून सकाळी ११.२६ मिनिटांनी सर्व नगरसेवकांना देण्यात आले असे सांगितले.

# ककोडी परिसरात प्लास्टिक कचऱ्यामुळे आरोग्य धोक्यात

**विनोद सुरसावंत**
**ककोडी (देवरी)** – तालुक्यातील अतिदुर्गम व नक्षलग्रस्त भाग असलेल्या ककोडी परिसरात मोठ्या प्रमाणात प्लास्टिक कचरा विखुरला गेल्याने पर्यावरणासह आरोग्य धोक्यात आले आहे.ककोडी ते बंजारी, ककोडी, आटरा रोड, ककोडी धोबाटोला टिपानगड.रोडवर आणि त्यास लागून असलेल्या शेती आणि झुडपी जगंल परिसरात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक पिशव्या, पाण्याचे ग्लास, बाटल्या फेकल्या जात असून ते पावसाच्या पाण्यासोबत शेतात तसेच तलावात वाहुन जात आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी



त्रास होत आहे. तसेच प्लास्टिक पिशव्या तलावात वाहुन जात असल्याने पाणी प्रदूषित होत आहे. तसेच जनावरे ह्या पिशव्या खाल्याने त्याना गंभीर बिमारी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# कोसमतोंडी येथे शारदा माता सभामंडपाचे लोकार्पण



**सडक अर्जुनी=** तालुक्यातील कोसमतोंडी येथे १७ आक्टोंबरला माजी मंत्री राजकुमार बडोले यांचे आमदार स्थानिक विकास निधीतून बांधण्यात आलेल्या शारदा माता सभामंडपाचे लोकार्पण माजी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री तथा पालकमंत्री मा. राजकुमार बडोले यांचे हस्ते करण्यात आले.

यावेळी सडक अर्जुनी पं.स.चे माजी सभापती गिरीधारी हत्तीमारे, माजी उपसभापती राजेश कठाणे, भाजप आदिवासी प्रदेश सदस्य लक्ष्मीकांत धनगाये, डॉ. बोधनकर , डॉ.विश्वनाथ राहांगडाले, मनोहर काशिवार, शिशीर येळे, युवा मोर्चा अध्यक्ष विलास बागडकर, अनिल गजभिये, गौरेश बावनकर, किशोर मळकाम, मनोहर निर्वाण, अशोक पटले, संजय काशिनाथ, शारदा मंडळाचे अध्यक्ष शांमकुवर कवरे व शारदा मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शारदा माता सभामंडपाचे लोकार्पण प्रसंगी बोलताना माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी सांगितले की,मागिल दहा वर्षांत अर्जुनी मोरगाव मतदार संघात विविध विकास कामे केली. लोकांची कामे करत असताना नेहमी सर्वांचे सहकार्य लाभले. मागिल काळात राहिलेले प्रस्तावित कामे मागी लावण्यास प्राधान्य देणार असल्याचे यावेळी सांगितले.

# मराठी कवी लेखक संघटनेच्या अध्यक्षपदी प्रमोदकुमार अणेराव

**भंडारा–** जिल्हा कवी लेखक संघटनेच्या जिल्हा अध्यक्षपदी सुप्रसिद्ध कवी,कथाकार व चित्रकार प्रमोदकुमार अणेराव यांची नुकतीच निवड करण्यात आलेली आहे. या संघटनेचे केंद्रीय अध्यक्ष सुप्रसिद्ध कादंबरीकार दिनकर दाभाडे यांनी ही निवड केली असून जिल्ह्याकरिता कार्यकारणी घोषित करण्यात आलेली आहे.

यात भंडारा कवी लेखक संघटनेच्या उपाध्यक्षपदी सुप्रसिद्ध कवी, नाटककार प्रा.डॉ. सुरेश खोब्रागडे लाखनी, सचिवपदी युवा कवी व गझलकार विवेक कापगते मोहाडी, कोषाध्यक्ष म्हणून कवी व पत्रकार मनोज केवट (मनोज सुमित्रा) गणेशपूर व संघटक म्हणून सुप्रसिद्ध कवियित्री अर्चना मोहनकर, तुमसर यांची निवड करण्यात आलेली आहे. या कवी लेखक संघटनेचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते व लेखक अमृत बन्सोड भंडारा यांची निवड केंद्रीय समितीने केलेली आहे. कार्यकारिणीत सदस्य म्हणून प्रा.आशा खंडाईत अड्याळ, प्रा.भगवंत शोभणे पवनी, डॉ.अनिल बोपचे कोंढा कोसरा, डॉ.जगजीवन कोटांगले जवाहरनगर, कवियित्री कविता कठाणे भंडारा, युवा लेखक देवानंद घरत लाखांदूर, आणि बसप्पा फाये भंडारा यांचा समावेश करण्यात आलेला आहे. कवी, लेखक, समीक्षक, विचारवंत यांचे अभिव्यक्ती स्वातंर्त्य व न्यायहक्क जपण्यासाठी व ते मिळवून देण्यासाठी या कवी लेखक संघटनेची निर्मिती करण्यात आलेली आहे. या कार्यकरणीचे प्रसिद्ध लेखिका अरुणा सबाने, केंद्रीय अध्यक्ष दिनकर दाभाडे, कवी गिरीश सपाटे, कवी कृपेश महाजन, कवी डॉ . विशाल इंगोले यांनी अभिनंदन केले आहे.

# चिचगड गावात घाणीचे साम्राज्य,स्वच्छता मोहिमेचे धिंडवडे

**चिचगड, :–** स्वच्छ भारत..स्वच्छ शहरचा नारा देत आपले शहर व गाव स्वच्छ ठेवण्याकडे शासन प्रशासनाकडून आवाहन करण्यात येते. गाव आणि शहर स्वच्छतेवर मोठा भर देण्यात येते. मात्र देवरी तालुक्यातील चिचगड गावाची वाटचाल ही तेवढ्याच झपाट्याने अस्वच्छतेकडे होत असल्याने चिचगडच्या नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न येरणीवर आला आहे.

एकीकडे कोरोनाची धास्ती अन गावात ठिकठीकाणी अस्वच्छतेचे साम्राज्यामुळे



भविष्यात कोरोनाच्या प्रादुर्भावास थांबवितांना इतर आजारांची लागण होण्याची शक्यता अधिक निर्माण झाली आहे. चिचगड ग्रामपंचायतील स्वच्छतेसाठी निधी तर मिळतो; मात्र तो निधी खरोखरच स्वच्छतेच्या कामावर किती खर्च होतो हे गावातील अस्वच्छतेवरुन स्पष्ट होते.चिचगड गावातील अनेक भागातील नाल्या घाणीने तुडूबं भरलेल्या असून ते घाणपाणी रस्त्यावर वाहताना बघावयास मिळते. काही वार्डात कचरा अस्ताव्यस्त पसरुन रोगाला आमंत्रण देण्याचे काम करीत आहे. गाव स्वच्छतेवर भर असल्याची ओरड स्थानिक ग्रामपंचायतीकडून केली जात असली तरी गावात अनेक ठिकाणी असलेली घान व कचरा हे ग्रामपंचायतीच्या स्वच्छता मोहिमेची धिंडवडे काढणारे ठरले आहे.

# गृह भेट आपुलकीची योजनेतंर्गत शहरात विविध योजनांची माहिती



**गोंदिया :** शहरातील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा, त्या योजनेपासून वंचित राहू नये याकरीता त्यांच्या घरापर्यत पोचून माहिती देण्यासाठी अप्पर जिल्हाधिकारी राजेश खवले यांच्या संकल्पनेतील गृहभेट आपुलकीची या कार्यक्रमाच्या माध्यमातून तहसिल कार्यालयाच्या कर्मचार्यांनी भेटी देत माहिती दिली.

गोंदिया तहसिल कार्यालयांतर्गत येत असलेल्या गोंदिया नगर परिषद क्षेत्रात संजय गांधी योजना शाखेच्या वतीने मोहीम राबविण्यात येऊन संजय गांधी निराधार योजना तसेच श्रावण बाळ योजनेच्या अनुषंगाने प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यत पोचून त्यांच्याकडून विशेष सहाय्य योजनेचे फॉर्म भरून घेण्यात आले. वृद्ध तसेच दिव्यांग व्यक्ती जे कोरोना सारख्या संसर्गजन्य परिस्थितीमध्ये घराबाहेर देखील निघू शकत नाही. अशा परिस्थितीमध्ये प्रशासनाकडून राबविण्यात येणाऱ्या या गृहभेट आपुलकीची संकल्पनेचे मोठ्या प्रमाणात कौतुक होत आहे. सदर संकल्पना ही अप्पर जिल्हाधिकारी राजेश खवले यांच्या मार्गदर्शनात संपूर्ण जिल्हाभर राबविण्यात येत असून जनतेकडून त्याला खूप मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. या मोहिमेत नायब तहसिलदार आर.एन. पालांदूरकर, अव्वल कारकून आशिष रामटेके, महसूल सहाय्यक जि.एस.खान सहभागी झाले होते.

# जिल्हा काँग्रेस ओबीसी विभाग प्रवक्तेपदी घनश्याम बघेलेंची निवड

**गोंदिया :–** गोंदिया जिल्हा काँग्रेस कमिटी अंतर्गत असलेल्या गोंदिया जिल्हा कॉंग्रेस ओबीसी विभागाच्या प्रवक्तेपदी गोरेगाव तालुक्यातील मोहाडी निवासी घनश्यमा मदनलाल बघेले यांची निवड जिल्हाध्यक्ष जितेंद्र कटरे यांनी केली आहे.



महाराष्ट्र प्रदेश कांग्रेस कमेटी ओबीसी विभागाच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व सामान्य माणसांपर्यत कांग्रेस पक्ष व पक्षाचे ध्येय, धोरण पोहचविण्याकरीता तत्पर राहणार असल्याची ग्वाही घनश्याम मदन–लाल बघेले यांनी दिली आहे.त्यांनी आपल्या नियुक्तीचे श्रेय जिल्हाध्यक्ष नामदेवराव किरसान, प्रदेश सचिव अमर वर्हाडे, विनोद जैन, उपाध्यक्ष झामसिंग बघेले, ओबीसी आघाडीचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र कटरे यांना दिले आहे.

# परसबागेतून मिळणार महिलांना रोजगार–अदानी फाउंडेशनचा पुढाकार




**तिरोडा :** सेंद्रिय भाजीपाल्याची वाढती मागणी व त्या तुलनेत पुरवठा कमी असल्याने याच बाबीला हेरून अदानी फाउंडेशन तिरोडा द्वारा ग्राम बेरडीपार येथील पन्नास महिलांना परसबाग लागवडीचे प्रत्यक्षिक देऊन भाजीपाला बियाणे वाटप करण्यात आले त्यासोबतच भाजीपाला लागवडीचे प्रशिक्षण तसेच सेंद्रिय खते, सेंद्रिय कीड नियंत्रक, बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले उत्पादित सेंद्रिय भाजीपाल्याला योग्य भाव मिळावा याकरिता संबंधित गावातील तीन महिलांना भाजीपाला विक्री करण्याकरिता अदानी शांती ग्राम टाऊनशीप समोर व्हेजिटेबल कार्ट अदानी फाउंडेशन द्वारा तयार करून देण्यात आले.

१७ ऑक्टोंबर २०२० रोज शनिवारला भाजीपाला विक्री व्यवसायाचे उद्घाटन रत्ना बिश्वास यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी प्रामुख्याने सौ राऊत मॅडम, सौ रांगणेकर मॅडम, व नव्या क्लबच्या सदस्या उपस्थित होत्या.

सदर व्यवसायाच्या माध्यमातून संबंधित महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी व त्यांच्या उत्पन्नात वाढ व्हावी या उदात्त हेतूने अदानी फाउंडेशन द्वारा हा उपक्रम सुरू केला आहे असे अदानी फाऊंडेशनचे हेड नितीन शिराळकर यांनी सांगितले.

### युवकांसाठी ऑनलाईन रोजगार मार्गदर्शन सत्राचे आयोजन आज

**गोंदिया :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद गोंदिया यांच्या वतीने जिल्ह्यातील उमेदवारांकरीता ऑनलाईन मार्गदर्शन सत्राचे आयोजन २० ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता करण्यात आले होते, परंतू काही अपरिहार्य कारणास्तव रद्द करण्यात आले असून ऑनलाईन मार्गदर्शन सत्राचे आयोजन आता २२ ऑक्टोंबरला दुपारी १२ वाजता घेण्यात येणार आहे. BANKING FINANCE SERVICES AND INSURANCE SECTOR मधील रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी या विषयाबाबत मार्गदर्शन सचिन राणे हे करणार आहेत.

या ऑनलाईन मार्गदर्शन सत्रामध्ये सहभागी होण्यासाठी https://meet.google.com/rcw-rtev-ofz या लिंकवर क्लिक करुन जॉईन व्हावे. सदर लिंकवरुन जॉईन व्हायचे असल्यास Google meet h>r app install करावी.

# पुरोगामी शिक्षक संघटनेचा उपक्रम,पुरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक किटचे वाटप



**गोंदिया:** भारतरत्न ए.पी.जे. अब्दूल कलाम साहेबांच्या जयंती निमित्ताने तसेच महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेचे संस्थापक आबा पाटील (सांगली) यांच्या जयंतीनिमित्त गोंदिया जिल्ह्यातील पुरग्रस्त भागातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी यांना शैक्षणिक मदतकिटचे वाटप कार्यक्रम जिल्हा परिषद सभागृहात आयोजित करण्यात आले.

शैक्षणीक किट ज्यात अर्धा डझन वह्या, पेन, पेन्सील,स्केल, रबर, कटर, कंपास व शाळा दफ्तर इत्यादी साहित्य वाटपाची सुरवात समाजभान–उपक्रम वाचन प्रेरणा दिवस म्हणून जिल्हा परिषद सभागृहात करण्यात आली. गोंदिया तालुक्यातील १८ व तिरोडा तालुक्यातील ८ असे २६ गावातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचा समावेश आहे.

ज्यांना या वर्षी पुराचा तडाखा बसला होता. सामाजीक बांधीलकी म्हणून एक हात मदतीचा पुरग्रस्त भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतकिट वाटप कार्यक्रम उप मुख्यकार्यकारी अधिकारी नरेश भांडारकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. यात बडगाव (बनाथर) शाळेच्या ६ विद्यार्थ्यांना प्राथमिक स्वरूपात मदतकिट वितरीत करुन कार्यक्रमाला सुरवात करण्यात आली.

भारतरत्न डॉ ए.पी.जे. अब्दूल कलाम व आबा पाटील सांगली यांच्या प्रतीमेचे पुजन करुन त्यांचा स्वप्नातील भारत निर्मीतेचे ध्येय बाळगून महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेच्या माध्यमातून आदरांजली वाहण्यात आली. याप्रसंगी यज्ञेश मानापुरे, विस्तार अधिकारी विनोद चौधरी, जिल्हा परिषद कर्मचारी महासंघ अध्यक्ष पी.जी. शहारे, उपशिक्षणाधिकारी आर.पी. रामटेके, नेतराम बिजेवार नेते, राजानंद वैद्य जिल्हा अध्यक्ष, प्राजक्ता रणदिवे महिला जिल्हा अध्यक्ष, हरिराम येळणे जिल्हा सरचिटणीस उपस्थित होते. संचलन जयश्री सिरसाटे महिला सरचिटणीस यांनी केले. प्रास्ताविकातून येळणे यांनी संघटनेची सुरुवात व ध्येय धोरण मांडली.

महिलाअध्यक्ष प्राजक्ता रणदिवे यांनी संघटनेची पुढील वाटचाल एक हात मदतीचा अनेक उपक्रमातून सुरूच राहणार असे विषद केले.यावेळी कोवीड१९ च्या सर्व सुचनांचे काटेकोर पालन करून उत्तम टेंभरे, एस.एम. बिसेन, कृष्णकुमार कुराये, परमानंद खोब्रागडे, प्रमोद बघेले, कलावती कोल्हटकर, एस.पी. नागपुरे, हिरालाल कावळे, तिलकचंद पाचे, सुरेश पाचे, श्रीराम पाचे या पालकांसह विद्यार्थी उपस्थित होते. आभार उत्तम टेंभरे यांनी मानले.

# अवैध वाळू उपसा प्रकरणी १० ट्रॅक्टर, १ जेसीबी, १ कार व १ मोटारसायकल जप्त



**गोंदिया:–** १४ ऑक्टोबरला डुग्गीपार पोलिसस्टेशनच्या हद्दीत पिपरी परिसरात चुलबंद नदीच्या घाटातून जेसीबीच्या साहाय्याने अवैध वाळू उपसा सुरू असतांनी पोलिसांच्या एका टिमने छापा मारला त्यावेळी अवैध वाळूचा उपसा करणारे अनेक वाहन जप्त करण्यात आली. ही कारवाई पोलिस अधिक्षक कार्यालय देवरी येथील सहाय्यक पोलिस निरीक्षक विजय धुमाळ, पोहवा कंगाली, पोना राऊत, परिवेक्षाधिन तहसीलदार शरद कांबळे, मंडळ अधिकारी कृपानंद गजभिये, पटवारी वाघधरे, सी–६० चे पोलिस उपनिरीक्षक गणेश माने व २५ कंमाडोनी केली.

चुलबंद नदीच्या पिपरी घाटावर पहाटे ३ वाजेच्या सुमारास वाळू घाटातून वेगवेगळ्या क्रमांकाचे जेसीबी, ट्रॅक्टर, ट्रॉली, बिना नंबरचे ट्रॅक्टर टॉली, एक मारूती कार क्रमांक एमएच३५/ पी–०६११, मोटारसायकल क्रमांक एमएच३५/ एनस–९९४७, एमएच३६/एसी–८९६४, ५ फावडे, ५ घमेले, १० ब्रॉस वाळू जप्त करण्यात आली. वाळू बाबात रॉयल्टीची विचारपूस केली असता समाधान कारक उत्तर मिळाले नाहीत व कागज पत्रेही दाखविण्यात आले नाही. एकूण ५३ लाख ०५ हजार ८०० रूपयांचे मुद्देमाल जप्त करण्यात आली.

यावेळी ट्रॅक्टर चालक व मालक फुटाळा येथील रहिवासी दिपक वंसता गहाणे (३४), सतिश विलास सोनवाने (१८), कोहमारा येथील रहिवासी महेश शंकर डुंबरे (३८), सडक अर्जुनी येथील रहिवारी महेन्द्र जयपाल वंजारी (३२), बोपाबोडी येथील राहणारे गणेश जीवन कापगते (२४), राधेश्याम रतिराम सराटे (४५), हमाल म्हणून कार्यरत बोपाबोडी रहिवासी घनश्याम रतिराम सराटे (४५), तुलसीराम सुका मेश्राम (४८), सुंदरी येथील रहिवासी निलकंठ कोंडू गजबे (४६), वडेगाव येथील रहिवासी शुभम उदाराम ब्राम्हणकर (१९), जेसीबी चालक सौंदड येथील रहिवासी विशाल सुरजलाल शहारे यांच्याकडून वरील माल जप्त करण्यात आली.याप्रकरणी मंडळ अधिकारी कृपानंद गजभिये यांच्या तक्रारीवरून डुग्गीपार पोलिसांनी कलम ३७९, ३४ भादंवि, ४८ (७) महाराष्ट्र जमीन महसूल कायदा १९६६ अन्वये वरील सर्व १० आरोपींवर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

साप्ताहिक बेरार टाईम्स निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार,दि.२१ ते २७ ऑक्टोंबर २०२०


# विदर्भ हे मुख्यमंत्र्यांचे कुटुंब नाही का?-खा.मेंढे

**भंडारा:** जिल्ह्यात दोन महिन्यापूर्वी महापूर येऊन गेला. होत्याचे नव्हते झाले. शेतकरी झालेल्या नुकसानीने गर्भगळीत झाला. त्यावेळी मुख्यमंत्री सोडा शासनातील एक दोन अपवाद वगळता कोणालाही धीर देण्यासाठी यावे वाटले नाही. मात्र, आज पश्चिम महाराष्ट्रात उद्भवलेल्या परिस्थितीनंतर सर्वजण तिकडे धावू लागले आहेत. मुख्यमंत्री गेल्या सात महिन्यांपासून खऱ्या अर्थाने माझे घर माझी जबाबदारी या भूमिकेत राहिले आहेत. परंतु पश्चिम महाराष्ट्रात पाहणी करण्यासाठी जाण्याचा निर्णय घेत त्यांनी एकाच राज्यातील दोन वेगवेगळ्या प्रदेशांना सापत्न वागणूक देत असल्याचे त्यांनी दाखवून दिले असल्याचा आरोप भंडारा-गोंदियाचे खासदार सुनील मेंढे यांनी केला आहे.



मागील सहा महिन्यांपासून फक्त स्वत:च्या घरात बसून असलेल्या मुख्यमंर्त्यांना आता मात्र पश्चिम महाराष्ट्रातील पूर्ण पीडितांच्या दु:खाची जाणीव झालेली दिसते. पवार कुटुंबातील सदस्य पाहणी करून आल्यानंतर आता मुख्यमंत्र्यांनी पूरग्रस्त भागांचा दौरा करणार असे जाहीर केले आहे. पूर पिडीतांच्या बाबतीत हेच सौजन्य पूर्व विदर्भाच्या वेळी मुख्यमंत्र्यांनी दाखविणे अपेक्षित होते. परंतु ते त्यांनी केले नाही. कोरोना, पुर आला तरी फक्त घरात बसलेले मुख्यमंत्री फक्त पश्चिममहाराष्ट्रातील बधितांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी घराबाहेर पडत असतील तर ही त्यांची कृती भेदभावपूर्ण आणि पूर्व विदर्भातील बांधवांवर अन्याय करणारी आहे. आजपयर्ंत केवळ माझे घर माझी जबाबदारी या उपक्रमाप्रमाणे वावरणाऱ्या मुख्यमंत्र्यांना अचानक घराबाहेर पडण्याचे सौजन्य कसे आले हाही चिंतनाचा विषय असून मुख्यमंत्री केवळ काही भागाचे नसून संपूर्ण महाराष्ट्राचे आहेत याची जाणीव त्यांनी ठेवावी, असा सल्लाही खासदार सुनील मेंढे यांनी दिला.

मुख्यमंत्री घरात बसले असताना भाजप नेते आणि महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी कोरोना आणि पूर संकटात राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात जाऊन प्रत्येकची विचारपूस केली याची जाणीवही खासदार मेंढे यांनी करून दिली आहे.

# उड्डाणपुलासह वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रश्नावर खा.पटेलांची अधिकाऱ्यांशी चर्चा

**गोंदिया** :- गोंदिया शहरातील जुन्या उड्डाणपुलाच्या ठिकाणी तयार करण्यात येत असलेल्या नव्या उड्डाणपुल व गोंदियातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारत बांधकामासंदर्भात खासदार प्रफुल पटेल यांनी जिल्हाधिकारी यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यासोबत बैठक घेत चर्चा केली. यामध्ये वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारत बांधकामासाठी अधिक निधीची आवश्यकता निर्माण झाल्याने यावर मुख्य सचिव संजयकुमार यांच्यासोबतच्या हायपॉवर कमिटीत चर्चा करुन निधी मंजुरीकरीता पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे बैठकित खा.पटेल यांनी सांगितले.



गोंदियाच्या वैद्यकीय महाविद्यालय इमारतीकरीता २०१४-१५ मध्येच १५० कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले. त्यानंतर तयार करण्यात आलेला प्रस्ताव ४५० कोटी रुपयाचा मंजूर करण्यात आला. परंतु गेल्या तीन चार वर्षात बांधकामाला सुरवात न झाल्याने त्याची किमंत ९५० कोटीवर पोचल्याने वाढीव निधी मिळविण्यासाठी येत्या आठवड्यात मंत्रालय स्तरावर बैठक घेऊन हा प्रश्न निकाली काढण्यात येणार असे सांगितले.

सोबतच गोंदियाच्या दोन भागांना जोडणाऱ्या रेल्वेलाईनवरील जुन्या उड्डाणपुलाच्या ठिकाणी नवीन उड्डाणपुल बांधकामास मंजुरी मिळालेली आहे.मात्र त्या ठिकाणी उड्डाणपुल तयार करण्यासाठी जो नकाशा तयार करण्यात आला,त्यात तांत्रिक अडचणी असून त्या नकाशानुसार पुल तयार झाल्यास अपघाताचे प्रमाण वाढण्याची शक्यता आढळून आल्याने नवीन नकाशा तयार करण्याच्या सुचना यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकार्यांना दिल्या.

यावेळी माजी आमदार राजेंद्र जैन, गोंदियाचे जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता विद्याधर सरदेशमुख, कार्यकारी अभियंता अब्दुल जावेद, सहायक अभियंता रविकिरण परेलवार उपस्थित होते.

## कुथे, पंचबुद्धे, मिश्रा, अफसाना पठान, नेहा नायक सभापती,स्थायी समितीवर लोकेश यादव, घनश्याम पानतवने

**गोंदिया** :- गोंदिया नगरपरिषदेच्या सभापतीपदाकरीता न्यायालयाच्या निर्देशानुसार (दि.१६) झालेल्या ऑनलाईन व्हीडओ कॉन्फरंस निवडणुकीत भाजप आघाडीने वर्चस्व स्थापन केले.सोबतच स्थायी समितीवरही भाजप आघाडीचेच वर्चस्व राहिले तर विरोधी पक्ष काँग्रेस व राष्ट्वादीने निवडणुकीवर बहिष्कार घातला. उपविभागीय अधिकारी अनिल खडतकर यांच्या अध्यक्षतेखाली मुख्याधिकारी करणकुमार चव्हाण यांच्या उपस्थितीत ही निवडणुक प्रकिया पार पडली.पाच नगरसेवकांनी सभापती पदाकरीता उमेदवारी अर्ज दाखल केले.त्यानंतर व्हीडीओ कॉन्फरंसच्या माध्यमातून नगरसेवकांचे मत मिळाल्यानंतर निकाल जाहिर करण्यात आला.यामध्ये बांधकाम सभापती पदावर राजकुमार कुथे,नियोजन सभापती पदी बंटी पंचबुध्दे,शिक्षण सभापती अफसाना पठाण,पाणी पुरवठा सभापती विवेक मिश्रा,महिला बालकल्याण सभापती पदावर नेहा नायक विजयी ठरल्या.तर स्थायी समिती सदस्यपदी लोकेश(कल्लू )यादव व घनश्याम पानतवने यांची निवड करण्यात आली.सदर निवडणुक रद्द करण्यासाठी विरोधी पक्षाच्यावतीने नागपूर खंडपीटात याचिका दाखल करण्यात आली असता न्यायालयाने ती याचिका फेटाळली.




## बालाघाटच्या प्रवाशांकरिता जीवनदायी ठरली एसटी

गोंदियाः- एकवेळ अशी होती की महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बससेवेला मध्यप्रदेशातील बालाघाट जिल्ह्यात प्रवाशी घेण्याकरिता खूप त्रास सहन करावा लागत असे. परंतु कोरोनामुळे असे दिवस आले की राज्य परिवहन महामंडळाची बससेवा बालाघाट जिल्ह्यातील लोकांकरिता ही जिवनदायी ठरली आहे. सध्या राज्य परिवहन महामंडळाच्या गोंदिया डिपोवरून बालाघाटला अनेक बसफेऱ्या सुरू आहेत.

# ओबीसींना चुचकारण्यासाठी ओबीसी उपसमिती राज्य सरकारचा निर्णय

**मुबंई:** मराठा आरक्षणाच्या मागणीने जोर पकडला असतानाच महाविकास आघाडीच्या सरकारने इतर मागास वर्ग (ओबीसी) नाराज होऊ नये म्हणून चुचकारण्याचा प्रयत्न चालवला आहे. ओबीसी समाजाच्या योजनांचा व आरक्षणाच्या लाभाचा अभ्यास करण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती नियुक्त केली असून समिती ओबीसी समाजासाठी नव्या योजनांची शिफारस राज्य सरकारला करणार आहे.मात्र या उपसमितीमुळे अनेक निर्णय लांबणीवर पडून ओबीसींच्या योजनांनाही अडचणीचा सामना करण्याची वेळ येण्याची शक्यताही वर्तविली जात आहे.त्यातच या समितीमध्ये भटक्या जाती विमुक्त जमाती व विशेष मागासप्रवर्गाबाबत कुठेच उल्लेख नसल्याने समितीच्या अडचणीत नव्हे तर ओबीसींच्या अडचणीची ही उपसमिती ठरण्याची शक्यता आहे.



अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ समितीचे अध्यक्ष आहेत. गृहनिर्माणमंत्री जितेंद्र आव्हाड, बहुजन समाजकल्याण मंत्री विजय वडेट्टीवार, वने, भूकंप पुनर्वसन मंत्री संजय राठोड आणि पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील हे समितीचे सदस्य आहेत. राज्यातील इतर मागास वर्ग समाजाला मिळालेल्या १९ टक्के आरक्षणाचा व त्यातून झालेल्या लाभाचा तसेच या समाजासाठी असणा?या योजनांचा आढावा समिती घेणार आहे. तसेच या समाजासाठी नव्या योजना योजनांची शिफारस राज्य सरकारला करणार आहे. आश्चर्य म्हणजे या समितीला शिफारशी सुचवण्यासाठी शासन निर्णयात कोणतीही कालमर्यादा घालण्यात आलेली नाही. याचा अर्थ सरकार या समितीचा आपल्याला हवा तसा राजकीय उपयोग करणार आहे. सदस्य निवडीमध्ये सरकारने संतुलन साधले आहे. राष्ट्वादीचे दोन, शिवसेनेचे दोन आणि काँग्रेसचा एक आशा मंर्त्यांची ही समिती आहे.

मराठा आरक्षणाच्या संदर्भात राज्यात रान उठलेले आहे. मराठ्यांचा समावेश ओबीसीमध्ये करू नका, अशी मागणी ओबीसी समाजाकडून सातत्याने होत आहे. त्या पार्श्वभूमीवर ओबीसी समाज नाराज होऊ नये म्हणून सरकारने हे पाऊल उचलले आहे.

# ओबीसींची जातीनिहाय जनगणना करा-खासदार धानोरकरांचे राज्यपालांना साकडे



**चंद्रपूर** : देशभरात ओबीसी समाजाची नेमकी लोकसंख्या किती आहे, हे कळणे अत्यावश्यक आहे. १९३१ साली इंग्रजांच्या कार्यकाळात जनगणना झाली होती, तेव्हा फक्त एकदाच ओबीसींची गणना करण्यात आली होती. तेव्हा देशात ५४ टक्के ओबीसी समाज असल्याचे स्पष्ट झाले होते. आरक्षण देताना त्याच्या अर्धे २७ टक्के आरक्षण ओबीसी समाजाला देण्यात आले. मात्र, सध्या देशभरात ओबीसी समाज नेमका किती आहे, याची निश्चित आकडेवारी उपलब्ध नाही. केंद्र पातळीवर जितक्या समित्या नेमण्यात आल्या किंवा विविध न्यायालयात याच्याशी संबंधित जितके विषय आले, त्यामध्ये ओबीसी समाजाची आकडेवारी मागण्यात आली आहे. मात्र ती उपलब्ध नाही. आता सन २०२१मध्ये होणाऱ्या जनगणनेत ओबीसी समाजासाठी वेगळा रकाना नाही. तो असायला हवा. ही प्रक्रिया लवकरात लवकर सुरू झाली पाहिजे, अशी मागणी खासदार बाळू धानोरकर व आमदार प्रतिभाताई धानोरकर यांनी आज राज्यपाल भगत सिह कोश्यारी यांच्याकडे केली आहे.

त्यासोबतच महाराष्ट्रातील सामाजिक समतोल राखण्यासाठी मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावावा. महाराष्ट्र सरकारसह देशातील २६ राज्ये व २ केंद्रशासित प्रदेशामध्ये आरक्षणाची ५० टक्के मर्यादा ओलांडली आहे. या प्रकारामुळे संपूर्ण देशात केवळ मराठा आरक्षणाला केवळ ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडली या एकाच मुद्यांवर सवीच्च न्यायालयाने स्थगिती दिली. हि अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. राज्य मागासवर्ग आयोगाने मराठा हे सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासलेले असल्याने त्यांना आरक्षण देण्यात यावे अशी शिफारस केली होती.

या शिफारसींनुसारच २०१३ मध्ये तत्कालीन आघाडी सरकारने हे आरक्षण मंजूर केले होते. राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार या संदर्भात न्यायालयीन लढा देऊन प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहे. केंद्रात भाजपचे सरकार बहुमतात आहे. महाराष्ट्रातील सामाजिक असमतोल दूर करण्याचे दृष्टीने केंद्रातील मोदी प्रणित सरकारने पुढाकार घेतल्यास मराठा आरक्षण शक्य आहे. ओबीसी समाजाकरिता राष्ट्रीय ओबीसी महासंघ यांच्या कडून अनेक प्रश्न समाजाचे मार्गी लागले आहे. त्यात प्रामुख्याने नागपूर येथे झालेल्या ७ डिसेंबर २०१६ रोजी अधिवेशनात नॉन क्रिमीलेयर ची मर्यादा ४.५ लाख पासून ६ लाख पर्यत करण्यात आली आहे. या सोबतच ओबीसी व मराठा आरक्षणाचे प्रश्न सोडविण्याकरिता लक्ष देण्याची विनंती खासदार बाळू धानोरकर आणि आमदार प्रतिभाताई धानोरकर यांनी राज्यपाल भगत सिह कोश्यारी यांना केली. तसेच जातीनिहाय जनगणना करून जिसकी जितनी संख्या भारी उसकी उतनी भागीदारी या तत्वाप्रमाणे जातीनिहाय जनगणना करून ओबीसी ना सख्यानुसार आरक्षण मिळावे अशी मागणी खासदार बाळू धानोरकर व आमदार प्रतिभाताई धानोरकर यांनी राज्यपाल भगत सिह कोश्यारी यांना केली.

# २० हजाराचा अवैधरित्या गांजा बाळगणारा जाळ्यात



**गोंदिया:** देवरी पोलीस ठाणेंतर्गत येत असलेल्या सडक अर्जुनी तालुक्यातील कोयलारी गावामध्ये एक इसम अवैधरित्या गांजा बाळगून असल्याची गुप्त माहिती पोलीस विभागाला मिळताच पोलीस अधिक्षक विश्व पानसरे व अप्पर पोलीस अधिक्षक अतुल कुलकणी यांच्या मार्गदर्शनात (१८ ऑक्टोबर) देवरी पोलीसांच्या चमूने धाड घालून २० हजार रुपयाचा गांजा हस्तगत केला.गांजा बाळगल्याप्रकरणी ५० वषीय इसम हिरालाल तुकाराम मेश्राम यास ताब्यात घेण्यात आले.

पोलीस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार कोयलारी गावात एक इसम सर्रासपणे अवैधरीत्या गांजा बाळगून विक्री करीत असल्याची माहिती मिळताच वरिष्ठांच्या आदेशानुसार देवरीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित कदम, अप्पर पोलीस अधिक्षक कार्यालयाचे वाचक विजयकुमार धुमाळ, हवालदार कगांली, पोलीस नायक राऊत, देसाई, पोलीस शिपाई बोपचे यांच्या चमूने कोयलारी येथील हिरालाल तुकाराम मेश्राम (वय ५०) यांच्या घरी जाऊन घराच्या समोरील शेतातील आंब्याच्या झाडाजवळील बांधीत पाहणी केली.त्यावेळी धान पिकाच्या बांधीत एका कोपऱ्यात पिवळ्या प्लास्टिक मध्ये सुतळीने गुंडाळलेले पोतळी आढळून आली.

सदर पोतळी बाहेर काढून पाहणी केली असता त्यात वाळलेला गांज्या सदृश्य हिरवट काळपट रंगाचा उग्रवासाच्या काड्या, पत्ते व चुरा असलेला किंचित नरम पणा असलेला पदार्थ मिळून आला. त्या पदार्थाची वास घेऊन खात्री केली असता गांजा असल्याचे खात्री झाल्याने मापारीकडून प्लास्टिक पिशवीसह वजन केले असता त्यात २.५४० कि.ग्रॉम अंदाजे सुमारे २०४००/- रुपयांचे माल मिळून आला.सदर माल जप्त करुन मुद्देमाल व आरोपी हिरालाल तुकाराम मेश्राम यास ताब्यात घेतले आहे.

# खासदार पटेलांची रविकांत बोपचेंच्या राँका जनसंपर्क कार्यालयाला भेट

**तिरोडा:-** राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते व राज्यसभा खासदार प्रफुलभाई पटेल यांनी (दि.१८) रविवारला आपल्या तिरोडा दौर्यादरम्यान राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते रविकांत (गुड्डू) खुशाल बोपचे यांच्यावतीने सुरु करण्यात आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पाटीच्या जनसंपर्क कार्यालयाला सदिच्छा भेंट देत चर्चा केली.



यावेळी माजी खासदार खुशाल बोपचे, माजी आमदार राजेंद्र जैन प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी मतदारसंघातील नागरिकांच्यावतीने कार्यालयाला प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अभ्यासानंतर काही मागण्यांचे निवेदन रविकांत बोपचे यांनी खासदार पटेल यांना सादर केले. त्या निवेदनात तिरोडा नगरपरिषद अंतर्गत नविन अंगणवाडीना मंजुरी मिळणे. रमाई आवास, प्रधानमंत्री आवास, शबरी आवास योजने अंतर्गत सन २०१८-१९ व २०१९-२० मधील मंजूर लाभार्थ्यांचा हिस्सा निधी मंजूर करणे. तहसिल कार्यालयात रेशन कार्डची (कोरे) सोय उपलब्ध करून देणे. आवास योजनेच्या लाभार्थ्यांसाठी शासकीय दरात रेती उपलब्ध करून देणे. उपविभागीय कार्यालय तिरोडा येथे पूर्णकालीन उपविभागीय अधिकारीची नियुक्ती करणे. पुरामुळे जीर्ण झालेले घर ज्यांचे नाव प्रधानमंत्री आवास योजनेच्या पपत्र "ड" मध्ये आहेत त्यांना त्वरित आवास मंजूर मिळण्यासह इतर मागण्यांचा समावेश होता. त्यासोबच मतदारसंघातील पक्ष संघटन व जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीवर चर्चा करण्यात आली.

यावेळी प्रामुख्याने राष्ट्वादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष पंचम बिसेन, युवा नेता रविकांत (गुड्डू) बोपचे, जिल्हाध्यक्ष महिला आघाडी राजलक्ष्मी तुरकर, सभापती निताबाई रहांगडाले, तालुका अध्यक्ष प्रेमकुमार रहांगडाले, माजी नगराध्यक्ष तथा नगरपरिषद सदस्य अजय गौर, जि.प.सदस्य कैलाश पटले, मनोज डोंगरे ,सुनिता मडावी, पं.स.सदस्य नत्थुभाऊ अंबुले, किशोर पारधी, मायाबाई शरणागत, तुन्डीलाल शरणागत तसेच डोंबळे काका, किरण बन्सोड, जगदीश कटरे, बाळूभाऊ येरपुडे, विजय बुरडे, राहुल गहेलवार, किरण पारधी, जगदीश (बालू) बावनथडे, भावानिसिंग बैस, नंदकिशोर शरणागत, सोनू भगत आदी प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ता उपस्थित होते.

## प्रधानमंत्री पीक विमा योजना

**गोंदिया** : जिल्ह्यात धान पिकासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम सन २०२० मध्ये राबविण्यात येत आहे. जिल्ह्यात धान पीक पक्वतेच्या अवस्थेत असून काही ठिकाणी पीक कापणीस सुरुवात झालेली आहे. सद्यस्थितीत जोरदार पावसाची शक्यता वर्तविण्यात आल्यामुळे शेतातील उभ्या पिकाचे किंवा काढणीपश्चात पिकांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने योजनेतील सहभागी शेतक?यांनी पीक नुकसानीची माहिती नुकसान झाल्यापासून ७२ तासाच्या आत संबंधित बँक, विमा कंपनी किंवा कृषि विभाग यांना देणे आवश्यक आहे.

# उमेद अभियानाचे अधिकारी जिपकडे वर्ग

**गोंदिया:** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती (उमेद) अभियानांतर्गत जिल्हा व तालुकास्तरावर प्रतिनियुक्तीवर कार्यरत विस्तार अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्ती रद्द करुन त्यांच्या सेवा जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्याचे आदेश १३ ऑक्टोबर रोजी देण्यात आले. मात्र तालुका स्तरावर काम करणारे समन्वयक आणि इतर कर्मचाऱ्यांचे भवितव्य अधांतरीच आहे.

शासनाच्या १८ जुलै २०११ रोजीच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची अंमलबजावणी सुरु करण्यात आली. या अभियानाच्या प्रभावी अमलबजावणीसाठी जिल्हा व तालुका स्तरावर आहे. अभियान व्यवस्थापन कक्षाची स्थापना करण्यात आली. उमेद अभियानाच्या विस्तारित संरचनेत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांमध्ये कार्यरत विस्तार अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्तीवर सेवा घेण्यात आली होती. अभियानातील अस्थायी स्वरुपाच्या पदांना शासनाने सप्टेंबर २०१९ पर्यंत मुदतवाढ दिली होती. मात्र त्यानंतर मुदतवाढ देण्यात आली नाही.

सद्यस्थितीत जिल्हा परिषदांमध्ये विस्तार अधिकारी व कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याने विकासकामांवर परिणाम होत आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानातील कार्यरत विस्तार अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्ती रद्द करुन त्यांच्या सेवा जिल्हा परिषदेकडे वर्ग करण्याचा निर्णय ग्रामविकास विभागाने घेतला आहे.

विस्तार अधिकाऱ्यांचा प्रश्न मिटला असून उमेद वभियानात इतर पदांवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दिलासा देणारा निर्णय घेण्यात आलेला नाही. परिणामी त्या कर्मचाऱ्यांचा शासनाच्या खासगीकरणाऱ्या निर्णयाला अद्यापही विरोध कायम आहे.

# कर्मचाऱ्यांना दणका हजेरीपटावरून निघणार वेतन

**गोंदिया:** आपल्या आगळ्या-वेगळ्या कार्यशैलीने नेहमीच चर्चेत राहणाऱ्या नगर परिषदेतील कर्मचारीही आपल्या मनमर्जीने कामकाज करीत असल्याबाबत शहरवासीही जाणून आहेत. मात्र अशा मनमर्जीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मुख्याधिकारी करण चव्हाण यांनी दणका दिला आहे. अर्जाशवाय यापुढे कुणालाही सुटी घेता येणार नसल्याबाबत त्यांनी पत्र काढले असून हजेरीपटावरुन वेतन काढणार असल्याचे स्पष्ट केले आहे.




नगर परिषदेच्या कामकाजाची आपली वेगळीच कार्यशैली आहे. विशेष म्हणजे नगर परिषदेतील काही अधिकारी-कर्मचारी नियमानुसार नव्हे तर आपल्या मर्जीने कामकाम करतात. ही बाब शहरवासीही चांगल्याने जाणून असून याचाच अनुभव मुख्याधिकारी चव्हाण यांनाही आता येवू लागला आहे. कित्येक विभागातील अधिकारी-कर्मचारी त्यांना कार्यालयीन वेळेत कार्यालयात हजर नसल्याचे दिसले. यावरुन त्यांना कार्यलयात नियमांना बाजूला सारुन अधिकारी-कर्मचारी काम करीत असल्याचा अनुभव आला.

विशेष म्हणजे नगर परिषद कार्यालय अतिआवश्यक सेवांमध्ये येत असल्याने अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून केला जात असलेला हा प्रकार खपवून घेण्यासारखा नाही. यामुळेच मुख्याधिकारी चव्हाण यांनी लगेच पत्र काढून मनमर्जीने काम करणाऱ्या अशा अधिकारी-कर्मचाऱ्यांना थेट दणका दिला आहे. पत्रातून त्यांनी अर्ज दिल्याशिवाय कुणीही गैरहजर आढळल्यास १ दिवसाचे वेतन कपात करणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

विशेष म्हणजे सध्या कोरोनाचा प्रादुर्भाव बघता काही अधिकारी-कर्मचाऱ्यांची कोरोना सर्वेक्षण तसेच अन्य कोविड विषयक कामांसाठी डयुटी लावण्यात आली आहे.मात्र याचाही काही जणांकडून गैरफायदा घेतला जात असल्याचे मुख्याधिकाऱ्यांच्या लक्षात आले आहे. यावर त्यांनी कोविड डयुटी असलेल्यांना अगोदर कार्यालयाला येऊन हजेरी लावून त्यानंतर कोविड डयुटीला जावे. तसेच सायंकाळी कार्यालयात येऊन आपली कार्यालयीन कामे आटोपण्याच्या सुचना दिल्या आहेत. अन्यथा त्यांना गैरहजर समजून त्या दिवसाचे वेतन कपात करण्यात येणार असेही पत्रातून स्पष्ट करुन दिले आहे.

**विभाग प्रमुखावर टांगती तलवार**

नगर परिषद कार्यालयातील विविध विभागातील कर्मचारी आपल्या मर्जीनेच ये-जा करीत असल्याचे बघता मुख्याधिकारी चव्हाण आता त्यांच्यावर अंकुश ठेवण्यासाठी संबंधित विभाग प्रमुखाला जवाबदारी सोपविली आहे. कोणत्याही कर्मचाऱ्याला सुटीसाठी अर्ज विभाग प्रमुखाला अर्ज द्यावा लागणार असून असे न झाल्यास त्या विभाग प्रमुखाचा पगार कापला जाणार आहे. त्यामुळे आता विभाग प्रमुखांवर टांगती तलवार आहे.

**हजेरीपटावरुन निघणार वेतन**

प्रत्येकच कार्यालयात हजेरीपट असते व त्यावरुनच कर्मचाऱ्यांचे वेतन निघते. मात्र नगर परिषद कार्यालयात आतापर्यंत असे काहीच नियम नसल्याचे दिसते. म्हणूनच अधिकारी-कर्मचारी आपल्या मर्जीने ये-जा करतात. मात्र मुख्याधिकाऱ्यांनी हा सर्व प्रकार संपुष्टात आणण्यासाठी आता हजेरीपटावरील उपस्थितीवरुनच वेतन निघणार असल्याचे आदेश काढले आहेत. अशात हजेरीपटावरील उपस्थितीनुसारच वेतन निघणार असून अन्यथा वेतन कपात केले जाणार आहे.

# रिक्त पदांमुळे चिचगड ग्रामीण रुग्णालयाची आरोग्य सेवा व्हेंटिलेटरवर

**सुभाष सोनवाने**

**चिचगड** :- देवरी तालुक्यातील चिचगड नक्षलग्रस्त व आदिवासी भागातील मुख्य गाव म्हणून ओळखले जाते.त्यातच या भागातील नागरिकांना आरोग्याची सोय चांगली उपलब्ध व्हावी यासाठी ग्रामीण रुग्णालय या ठिकाणी सुरु करण्यात आले.मात्र या ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारीसह इतर अनेक पदे रिक्त असल्याने रुग्णांना योग्य उपचाराअभावी परत जाण्याची वेळ येऊ लागली आहे.त्यामुळे ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे तातडीने भरली जावीत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.




**अनेक पदे रिक्त**

**चिचगड ग्रामीण रुग्णालयात संपुर्ण २६ पदे मंजुर असुन फक्त १६ पदे भरलेली आहेत व १० पदे अनेक वर्षापासुन रिक्त आहेत. त्यामध्ये वैद्यकिय अधीक्षक रिक्त,सहाय्यक अधिक्षक रिक्त,कनिष्ट लिपीक २-रिक्त,अधिपरिचारीक ३-रिक्त, प्रयोगशाळा सहाय्यक १-रिक्त,क्ष-किरण तंत्रज्ञ १-रिक्त,शिपाई १-रिक्त पदे आहेत.**

गेल्या दशकापुवी तयार करण्यात आलेल्या या ग्रामीण रुग्णालय परिसरातील लोकसंख्या सुध्दा वाढली असून वाढलेल्या लोकसंख्येच्या तुलनेत अधिकारी व कर्मचारी वर्ग अपुरा पडू लागला आहे.त्यातच रुग्णालयातील खाटाही कमी पडू लागल्याने १०० खाटांचे रुग्णालय व्हावे अशी मागणी केली जाऊ लागली आहे.

चिचगड हे त्या क्षेत्रातील मध्यवती ठिकाण असून मोहांडी,ककोडी , केशोरी, अबोंरा, आलेवाडा,परसोडी , कवलेवाडा, सिंदीबीरी या परिसरातील अनेक गावांतून दररोज १०० ते २०० च्या आसपास रुग्ण उपचारासाठी येत असतात.या रुग्णालयात गेल्या अनेक वर्षापासून वैद्यकिय अधिकारी डॉ भोंगाडे हे येथे एकमेव कार्यरत आहेत. त्यांनाच आता अतिरिक्त कामे सांभाळावे लागत आहे.रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता येथे कर्मचारी वर्गाची व सोई-सुविधाची गरज आहे. त्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

page 46.indd 4 10/20/2020, 6:26 PM